## नाशिकजवळ एक्स्प्रेसचे डबे घसरले, एका प्रवाशाचा मृत्यू



**नाशिक :** मुंबईहून निघालेल्या पवन एक्स्प्रेसचे डबे रविवारी (दि. ३) दुपारी सव्वातीनच्या सुमारास देवळाली-लहवीतदरम्यान घसरले. या अपघातात एका प्रवाशाचा मृत्यू झाला असून काही जखमी झाले आहेत. या अपघातामुळे मुंबईहून नाशिककडे येणाऱ्या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली असून लांब पल्ल्याच्या आठ ते १० गाड्या विविध स्थानकांवर थांबविण्यात आल्या आहेत. मुंबई-जयनगर (बिहार) पवन एक्स्प्रेस इगतपुरीकडून नाशिककडे येत असताना हा अपघात झाला. लहवीतजवळ रेल्वेमार्ग उखडून डबे घसरले. यानंतर प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. अपघाताची माहिती समजताच रेल्वे, जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांसह अग्निशमन दलाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि त्यांनी बचाव व मदतकार्य हाती घेतले.

सोमवार, ४ एप्रिल २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक २५६
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

### अंतरंग

'सर्वधर्मसमभावामध्ये हिंदूंचाही सन्मान व्हायला हवा'/२
कर्जतमधील वाहतूक कोंडी सुटता सुटेना!/७
ऑस्ट्रेलियाने सातव्यांदा कोरले विश्वचषकावर नाव/८



**पनवेल : केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पनवेल व उरण तालुक्यातील ७७०० कोटी रुपयांच्या एक्स्प्रेस वे विकासकामांचे लोकार्पण तसेच भूमिपूजन रविवारी करण्यात आले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ चिंचपाडा गाव येथे झालेल्या या सोहळ्यास पालकमंत्री आदिती तटकरे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार श्रीरंग बारणे, खासदार सुनील तटकरे, माजी मंत्री व आमदार रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार मंदा म्हात्रे, महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी, अधिकारी यांची उपस्थिती होती.** (छाया : लक्ष्मण ठाकूर) **वृत्त उद्याच्या अंकात.**

# मुंबई-गोवा महामार्गाचे काम एका वर्षात पूर्ण करणार

## केंद्रीय रस्ते, वाहतूक, महामार्गमंत्री नितीन गडकरी यांची ग्वाही



**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम एका वर्षात पूर्ण केले जाईल, अशी ग्वाही केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी (दि. ३) माणगाव तालुक्यातील कशेणे येथील कार्यक्रमात बोलताना दिली.

इंदापूर-माणगाव दिघी पोर्ट, इंदापूर-तळा-आगरदंडा, पुणे-रायगड जिल्हा सीमा राष्ट्रीय महामार्गाचे लोकार्पण आणि मुंबई-गोवा महामार्गावरील इंदापूर ते कासूदरम्यानच्या काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन रविवारी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला व्यासपीठावर पालकमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, माजी मंत्री व आमदार रवींद्र चव्हाण, माजी मंत्री व आमदार रविशेठ पाटील, आमदार भरत गोगावले, आमदार अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाचे मुख्य अभियंता तथा क्षेत्रीय अधिकारी राजीव सिंह, राज्य महामार्गाचे मुख्य अभियंता संतोष शेलार, राष्ट्रीय महामार्गाच्या अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, व्यासपीठावर उपस्थित होते.

या वेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे स्वागत करण्यासाठी भाजपचे प्रदेश सरचिटणीस रविभाऊ मुंढे, ज्येष्ठ नेते कृष्णा कोबनाक, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते, तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे, युवा मोर्चाचे चिन्मय मोने, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष शर्मिला सत्वे, प्राजक्ता शुक्ला, यशोधरा गोडबोले यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

> **आम्ही शरद पवारसाहेबांकडून, अजितदादा पवार यांच्याकडून नेहमीच ऐकत असतो की ज्या वेळेला महाराष्ट्र राज्याच्या किंवा या भूमीच्या विकासाची गोष्ट येते किंवा कुठलीही बाब येते तेव्हा ना. नितीन गडकरीसाहेब भरभरून महाराष्ट्राला देत असतात आणि त्याचा अनुभव माझ्यासारख्या एक लहान लोकप्रतिनिधीला आणि कार्यकर्तीला आला आहे.**
>
> **-आदिती तटकरे, पालकमंत्री, रायगड**

### खा. सुनील तटकरेंकडून ना. नितीन गडकरींचे कौतुक

**या वेळी रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कार्याचे कौतुक केले. दिल्लीच्या तख्तावर महाराष्ट्राचे नितीन गडकरी कौतुकास्पद काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले.**

या वेळी मार्गदर्शन करताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी पुढे म्हणाले की, मुंबई-गोवा महामार्गावरून मला अनेकदा महाराष्ट्राचा मंत्री असताना जाण्याची संधी मिळाली आणि ट्रॅफिक जाममध्ये मी अनेकवेळा फसलो आहे. खारपाडा पुलावर मी अनेकदा अडकलो असून तो पूल बांधण्याची संधीही मला त्या काळात मिळाली. मी महाराष्ट्राचा बांधकाममंत्री असताना कोकणात सागरी मार्गावरील १८ पूल बांधण्याचे काम पूर्ण केले. मुंबई-गोवा महामार्ग हा प्रकल्प ११ तुकड्यांमध्ये आहे. त्याचे बहुतेक प्रश्न सुटले असून लवकरच काम सुरू होईल. येत्या एक वर्षात या महामार्गाचे काम पूर्ण करण्याचा पूर्णपणे प्रयत्न करणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे अनेक किल्ले कोकणच्या भूमीवर आहेत. या कोकणातील किल्ल्यांचे जेवढे कामाचे प्रस्ताव येतील तेवढे मी पूर्ण करेन, असे सांगून शिवरायांचे स्थान आई-वडिलांपेक्षा महत्त्वाचे आहे, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या वेळी नमूद केले.

जेएनपीटीत माझ्या कारकिर्दीत एक हजार कोटींची कामे केली. जेएनपीटीतील स्पेशल इकॉनॉमिक झोनमुळे जिल्ह्यातील दीड लाख तरुणांना रोजगार मिळेल. बिपीटीवरून वॉटर टॅक्सीसेवा सुरू करण्याचा माझा प्रयत्न आहे. कोकणाला निसर्गरम्य असा परिसर लाभला असून कोकणचा विकास झाला पाहिजे, असेही ना. गडकरी यांनी सांगितले.



(छाया : सलीम शेख)

आपल्या भाषणात पालकमंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, मुंबई-गोवा महामार्गावरील कासू ते इंदापूर हा जो टप्पा आहे त्याचे काँक्रीटीकरण व्हावे, जेणेकरून दरवर्षी जे चाकरमानी किंवा रायगडवासीय असतील त्यांना पावसाळ्यासह वर्षाच्या बारा महिने बरेच काही सोसावे लागते. ही अडचण कायमस्वरुपी दूर व्हावी यासाठी जवळपास ४०० कोटींहून अधिक निधी आपल्याला केंद्र सरकारच्या माध्यमातून नितीन गडकरीसाहेबांच्या माध्यमातून उपलब्ध झाला आहे.

दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या स्वागतासाठी भाजपने रस्त्याच्या दुतर्फा झेंडे लावल्याने कार्यक्रमाच्या ठिकाणी कमळच कमळ दिसत होते. भाजपचे तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय भुस्कुटे यांनी केले.

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाला २०११मध्ये सुरुवात झाली होती, पण २०२२ उजाडले तरी महामार्ग चौपदरीकरणाचे काम पूर्णत्वास गेलेले नाही. भूसंपादनातील दिरंगाई, परवानग्यांमध्ये आलेल्या अडचणी, निधीची कमतरता, अधिकाऱ्यांचा कुचकामीपणा, प्रशासकीय उदासीनता यामुळे काम रखडले. या भागातील नागरिकांनाही काम पूर्ण न झाल्याने अनेक अडचणींचा सामना करावा लागला आहे, परंतु आता हाती घेतलेले काम तडीस नेतातच असा ज्यांच्या खाक्या आहे ते केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या महामार्गाचे काम एका वर्षात पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे या कामाला वेग पकडून चाकरमानी प्रवाशांसह वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे.

---

### निवडक

#### पाकिस्तानची संसद अखेर बरखास्त

**इस्लामाबाद :** पाकिस्तान संसदेतील अविश्वास प्रस्ताव फेटाळल्यानंतर पंतप्रधान इम्रान खान यांनी राष्ट्रपतींना संसद बरखास्त करण्याची शिफारस केली. त्यानुसार राष्ट्रपतींनी संसद बरखास्त करण्याचे आदेश दिले आणि त्यानुसार कार्यवाही झाली. त्यामुळे आता पुढील ९० दिवसांमध्ये निवडणुका घ्याव्या लागणार आहेत.

#### आकाशातून पडले विविध प्रकारचे अवशेष

**मुंबई :** राज्यातील नागपूर, अमरावती, अहमदनगर, औरंगाबादसह अन्य काही ठिकाणी रात्री आकाशातून चकाकणारी वस्तू खाली पडताना अनेकांनी पाहिली. याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. हे उल्कापिंड किंवा उपग्रहाचे तुकडे असल्याचे सांगितले जात आहे.

## राज ठाकरे सत्यच बोलले!

### ■ विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्याकडून समर्थन



**नांदेड : प्रतिनिधी**

राज ठाकरे यांनी जे सांगितले ते सत्यच आहे. ते काही चुकीचे बोलले नाही, असे माजी मुख्यमंत्री तथा विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. फडणवीस रविवारी (दि. ३) नांदेड दौऱ्यावर होते. त्या वेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही प्रतिक्रिया दिली.

मुंबईतील छत्रपती शिवाजी पार्क येथे शनिवारी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा गुढीपाडवा मेळावा झाला. या मेळाव्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ठाकरे सरकारवर सडकून टीका केली. २०१९च्या विधानसभा निवडणूक प्रचारात उद्धव ठाकरे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत व्यासपीठावर एकत्र असायचे. तेव्हा मोदी-शाह यांनी देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री होतील, असे जाहीर केले होते, मात्र निवडणूक झाली आणि उद्धव ठाकरेंनी अडीच अडीच वर्षे मुख्यमंत्रीपदाची टूम काढली. निवडणुकीनंतर त्यांना हा साक्षात्कार झाला, अशा शब्दांत राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्या दुटप्पी भूमिकेचा समाचार घेतला.

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरे यांचे समर्थन केले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात भाजप सर्वांत मोठा पक्ष म्हणून निवडून आला. भाजपने शिवसेनेशी युती केल्याने शिवसेनेच्याही चांगल्या जागा आल्या. दोघांना जनतेने बहुमत दिले, पण त्या बहुमताचा अनादर करुन शिवसेनेने भाजपच्या पाठीत खंजीर खुपसून कपटाने सत्ता मिळवली. राज ठाकरे यांनी आपल्या भाषणातून तेच सांगितले आहे, असे फडणवीस म्हणाले.

## आमदार बबनराव शिंदे व मुलाची 'ईडी'कडून चौकशी

**सोलापूर : प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील माढ्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार बबनराव शिंदे आणि त्यांचे पुत्र रणजितसिंह शिंदे अंमलबजावणी संचालनालय अर्थात ईडीच्या कचाट्यात सापडले आहेत. त्यांची ईडीकडून चौकशी झाली असल्याची माहिती समोर आली आहे.

आमदार शिंदे आणि त्यांचे पुत्र रणजितसिंह हे जिल्हा दूध संघाचे चेअरमनदेखील आहेत. साखर कारखान्यातील शेतकऱ्यांच्या नावावर परस्पर कर्ज उचलण्यासोबतच अन्य प्रकरणांमध्ये त्यांची ईडीकडून चौकशी करण्यात आली आहे.

याबाबत आमदार शिंदे किंवा राष्ट्रवादीकडून कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही, मात्र आमदार शिंदे यांना ईडीने बजावलेल्या दोन समन्सचे फोटो माध्यमांच्या हाती लागले आहेत. त्यामुळे मागील तीन महिन्यांपासून ही चौकशी सुरू असण्याची शक्यता आहे. साखर कारखान्याचे हे संपूर्ण प्रकरण ५०० कोटींच्या घरात जात असल्याची माहिती आहे. यामुळे सहकार क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

## पनवेल मनपा हद्दीत मालमत्ता करावरील शास्तीमध्ये सवलत

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीत मालमत्ता करावरील शास्तीवर अखेर आयुक्त गणेश देशमुख यांनी सवलत जाहीर करून नागरिकांना दिलासा दिला आहे.

पनवेल महापालिका हद्दीतील सिडको नोडमध्ये प्रथम व पूर्वलक्षी प्रभावाने कर आकारणी होत आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आमदार, नगरसेवक व विविध सेवाभावी संस्थांनी मालमत्ता करावरील शास्तीमध्ये सवलत देण्याची मागणी केली होती. शास्तीमध्ये सवलत देणे उचित असल्याचे दिसून आले. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ८ करधन नियम ५१ अन्वये शास्ती किंवा फी माफ करण्याबाबत आयुक्तांना असलेल्या अधिकाराचा वापर करून महापालिका हद्दीतील मालमत्ताधारकांना शास्तीमध्ये सवलत जाहीर करण्यात आली आहे.



**मालमत्ता कर आणि शास्ती सवलत**

| | |
|---|---|
| १.४.२०२२ ते ३१.५.२०२२ | - १००% |
| १.६.२०२२ ते ३१.७.२०२२ | - ७५% |
| १.८.२०२२ ते ३०.९.२०२२ | - ५०% |
| १.१०.२०२२ ते ३१.२.२०२२ | - २५% |

**टीप :** १ जानेवारी २०२३ पासून १००% शास्ती लागणार आहे.


# सर्वधर्मसमभावामध्ये हिंदूंचाही सन्मान व्हावा

## ▪ भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

बाकी सर्व धर्मांचा सन्मान करायचा आणि केवळ हिंदूंवर बंधने लादायची असे चालणार नाही. सर्वधर्मसमभावामध्ये हिंदूंचाही सन्मान झाला पाहिजे, असे स्पष्ट प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी रविवारी (दि. ३) कोल्हापूर येथे पत्रकार परिषदेत केले.

ते म्हणाले की, देशात सर्वधर्मसमभाव किंवा धर्मनिरपेक्षता यांचे इतके स्तोम वाढले की हिंदूंना हिंदू म्हणवून घेण्याची लाज वाटू लागली. हिंदू म्हणजे बुरसटलेले, असे देशात सातत्याने पुस्तके, शिक्षण व भाषणातून मांडले गेले. जातीय तेढ निर्माण होऊ नये हे केवळ हिंदूनी सांभाळले पाहिजे असे झाले, पण सर्वधर्मसमभाव म्हणजे केवळ मुसलमानांचा सन्मान करायचा पण हिंदूंचा सन्मान करायचा नाही, असे चालणार नाही. तुम्ही आमच्या आरतीचा सन्मान करा, आम्ही तुमच्या अजानचा सन्मान करू. आपण एकत्र प्रेमाने राहू. पण सर्वधर्मसमभावामध्ये हिंदूंचाही सन्मान झाला पाहिजे.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे गुढीपाडव्याचे भाषण हे सामान्य हिंदूंच्या मनाला सुखावणारे होते. त्यांच्या भाषणामुळे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची आठवण आली, अशी प्रतिक्रिया चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केली.

ते म्हणाले की, कोल्हापूर शहरात विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घरोघर फिरून एका शिक्षणसंस्थेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी मतदारांच्या बँक खात्यांची माहिती गोळा करत आहेत. मतदानाच्या वेळी बँक खात्यात पेटीएमद्वारे पैसे पाठविले जाण्यासाठी ही माहिती गोळा केली जात असल्याचे समजते. कोणाच्या तरी खात्यातून मतदारांच्या खात्यात काळा पैसा पाठविणे हे मनी लॉंडरिंग आहे. मनी लॉंडरिंगच्या प्रयत्नाची ईडीकडे तक्रार करणार असून चौकशीची मागणी करणार आहे. शहरातील मतदारांनाही आपले आवाहन आहे की, थोड्या रकमेच्या मोहात पडून आपले बँक खात्याचे तपशील देऊ नये, पुढे ईडीच्या चौकशीच्या फेऱ्यात अडकण्याचा धोका आहे.

त्यांनी सांगितले की, अधिकाऱ्यांनी कोल्हापुरातील दारू दुकानदारांची बैठक घेऊन कॉंग्रेसला पाठिंबा देण्यासाठी दबाव आणल्याची माहिती आपल्याला मिळाली आहे. कॉंग्रेसला पराभव दिसू लागल्याने सरकारी यंत्रणेचा दुरुपयोग होत आहे, परंतु आम्ही सरकारी अधिकाऱ्यांना याचा जाब विचारू.

### कोल्हापूर विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपचा जोरदार प्रचार

*कोल्हापूर उत्तर विधानसभा पोटनिवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या प्रचाराला गती आली आहे. भाजपचे नेते आशिष शेलार ४ व ५ एप्रिल रोजी प्रचारात भाग घेतील. भाजप राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे ६ एप्रिल रोजी प्रचार करतील. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर ७ एप्रिल रोजी सभांना संबोधित करतील. विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले हे ९ व १० एप्रिल रोजी कोल्हापुरात प्रचारासाठी येतील. याखेरीज पक्षाचे अनेक नेते मतदारसंघात प्रचारासाठी येणार आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.*

# पंतप्रधान मोदींच्या जीवनावर आधारित ‘मोदी स्टोरी’ पोर्टल लॉंच

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनाबद्दल माहित नसलेल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी ‘मोदी स्टोरी’ नावाचे एक पोर्टल तयार करण्यात आलेय. यामध्ये मोदींच्या आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यावर त्यांना भेटलेल्या विविध क्षेत्रातील व्यक्तींनी सांगितलेल्या त्यांच्या जीवनातील गोष्टींचा समावेश असेल. ‘मोदी स्टोरी’ हे पोर्टल आज रविवारी (दि. ३) लॉंच करण्यात आलेय.



मोदी स्टोरी पोर्टलवर दिलेल्या माहितीनुसार, मोदी स्टोरी पोर्टलची घोषणा हा एक स्वयंसेवी उपक्रम आहे, ज्या अंतर्गत नरेंद्र मोदींच्या जीवनाशी संबंधित रंजक कथा सांगितल्या जातील. नरेंद्र मोदींना जवळून पाहिलेल्या व्यक्तींकडून मोदींचे किस्से त्यांच्या जीवनातील माहित नसलेल्या गोष्टी एकत्र आणण्याचा त्यांचा उद्देश आहे. कोणीही व्हिडिओ, ऑडिओ किंवा मजकूराच्या स्वरूपात यामध्ये योगदान देऊ शकते, असे त्यात म्हटले आहे. महात्मा गांधींच्या नात सुमित्रा गांधी कुलकर्णी यांच्या हस्ते या पोर्टलचे उद्घाटन करण्यात आले.

नव्या भारताची निर्मिती ही सामान्य लोकांच्या एकत्र येण्याची कहाणी आहे, महानतेची आकांक्षा बाळगून, ‘आम्ही लोक’ या भावनेने असे अनेक लोक आहेत, ज्यांनी मोदींच्या जीवनाची, त्यांच्या हेतूची झलक पाहिली आहे. मोदी स्टोरी अशा आवाजांबद्दल आहे, असे पोर्टलच्या बायोमध्ये म्हटलेय.

ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता नीरज चोप्रा, शास्त्रीय नृत्यांगना सोनल मानसिंग, अभिनेता आणि राजकारणी मनोज तिवारी, माजी वित्त सचिव हसमुख अधिया आणि अध्यात्मिक नेते स्वामी अवधेशानंद गिरी यांच्यासह अनेक व्यक्तींनी या कथासंग्रहात योगदान दिले आहे.

मोदी स्टोरी ट्विटर हॅंडलने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये ऑलिंपियन नीरज चोप्रा म्हणाला की, आम्ही भारताच्या पंतप्रधानांना भेटत आहोत, असे आम्हाला वाटले नाही. ते प्रत्येक खेळाडूशी बोलले आणि वैयक्तिकरित्या आमच्याबद्दल जाणून घेतले. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून क्रीडा क्षेत्रात खूप बदल झाले आहेत, असे नीरज चोप्राने सांगितले.

# भिवंडीतील आश्रमशाळेत विषबाधा; एका विद्यार्थिनीचा मृत्यू; १६ विद्यार्थ्यांवर उपचार

**भिवंडी : प्रतिनिधी**

भिवंडी येथील दाभाड भागातील एका आश्रम शाळेमधील ज्योत्स्ना सांबर (वय नऊ) हिला उलट्या आणि जुलाबाचा त्रास झाल्याने मृत्यू झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ज्योत्स्नाच्या मृत्यूनंतर आणखी १६ विद्यार्थ्यांना अशाच प्रकारचा त्रास जाणवला आहे. त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. त्यांना उलट्या आणि जुलाबाचा त्रास का झाला याची माहिती अद्याप कळू शकली नाही, परंतु अन्नातून किंवा पाण्यातून त्यांना विषबाधा झाली असावी असा अंदाज डॉक्टरांकडून वर्तविला जात आहे.

घटनेनंतर आरोग्य केंद्रातील डॉक्टर तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने आश्रमशाळेतील अन्नाचे आणि पाणाचे नमुने गोळा केले आहेत. दाभाड येथील शिरोळे गावात एक आश्रम आहे. सुमारे ३०० विद्यार्थी या आश्रमशाळेत राहतात.

बुधवारी रात्री आश्रमातील ज्योत्स्ना हिला अचानक उलट्या आणि जुलाबाचा त्रास होऊ लागला. आश्रमशाळेतील शिक्षकांनी तिला उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले. तिची प्रकृती चिंताजनक असल्याने तिला डॉक्टरांनी तत्काळ भिवंडी येथील स्व. इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले, मात्र तिचा मृत्यू झाला होता.

यानंतर गुरूवार, शुक्रवार आणि शनिवारी आणखी १६ विद्यार्थ्यांना अशाच प्रकारचा त्रास झाला. त्यांना ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल केले. यातील सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.


या घटनेनंतर दाभाड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांच्या पथकाने आश्रम शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची तपासणी सुरू केली आहे. तर अन्न व औषध प्रशासनाने येथील अन्नाचे आणि पाण्याचे नमुने गोळा केले आहेत. विषबाधेतून हा प्रकार झाला असावा असा अंदाज डॉक्टरांकडून वर्तविला जात आहे.

# मलायकाला रुग्णालयातून डिस्चार्ज; तब्येतीत सुधारणा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अभिनेत्री मलायका अरोराला रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला आहे. शनिवारी (दि. २) झालेल्या कार अपघातानंतर तिला नवी मुंबईतील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

मुंबई-पुणे हायवेवर खालापूर टोल नाक्याजवळ काही गाड्या एकमेकांना धडकल्या होत्या. दोन गाड्यांनी मलायकाला रेंज रोव्हरला धडक दिली होती. या अपघातात मलायकाच्या कपाळाला किरकोळ दुखापत झाली. तिला तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आलं होते. तिची प्रकृती ठीक असून सीटी स्कॅनच्या रिपोर्टमध्येही काही आढळले नाही, अशी माहिती डॉक्टरांनी दिली. मलायकाची



बहीण अमृता अरोरानेही माध्यमांना तिच्या प्रकृतीविषयीची माहिती दिली. ‘मलायका बरी होतेय’, असे तिने सांगितले. मलायका पुण्याहून मुंबईला परत येताना तिच्या कारचा अपघात झाला.

खालापूर टोलनाक्याजवळ तीन गाड्या एकमेकांवर आदळल्या. यापैकी दोन पर्यटकांच्या गाड्या होत्या. या दोन गाड्यांनी मलायकाच्या रेंज रोव्हरला धडक दिली. अपघातप्रवण क्षेत्रातच हा अपघात झाला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर ३८ किमी अंतरावर हा अपघात झाला आहे. यात तिनही वाहनांचे नुकसान झाले.

अपघातानंतर ड्राइव्हरने ताबडतोब तिथून पळ काढला. तर इतर अपघातग्रस्तांना किरकोळ जखमा झाल्या आहेत. संबंधित अपघाताबाबत चौकशी करून एफआयआर नोंदविला जाईल, अशी माहिती पोलिसांनी दिली.

अपघातातील तिन्ही गाड्यांचे नोंदणी क्रमांक मिळाले असून प्रत्यक्षात काय घडलं, हे समजून घेण्यासाठी मालकांशी संपर्क साधू. त्यानंतर एफआयआर नोंदविला जाईल, असे खोपोली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेश काळसेकर म्हणाले.

# दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी सर्वांनी एकत्रितरित्या काम करणे गरजेचे

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे प्रतिपादन

**पालघर : प्रतिनिधी**

दिव्यांग बालकांच्या शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी राज्यामध्ये विविध संस्था कार्य करत आहेत. या संस्थांना पाठबळ देण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्रित येऊन काम करणे गरजेचे असल्याचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी सांगितले. नूतन गुलगुले फाऊंडेशन संचलित दिव्यांगासाठी उभारण्यात येणाऱ्या स्वानंद सेवा सदन या इमारतीचे भूमिपूजन अर्नाळा येथे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.




ज्या दिव्यांग बालकांच्या शैक्षणिक खर्चाची जबाबदारी पालक उचलू शकत नाहीत अशा बालकांसाठी स्वयंसेवी संस्था या कार्य करत असतात या संस्थेमार्फत विद्यार्थ्यांचे पालन पोषण तर होतेच तसेच त्यांच्या शिक्षणाची जबाबदारीही स्वयंसेवी संस्था उचलत असते. आशा स्वयंसेवी संस्थांना समाजातील दानवीरांनी तसेच समाजातील प्रत्येक घटकाने आर्थिक मदत करून सामाजिक जबाबदारी पार पाडावी असे आवाहनही राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

नूतन गुळगुळे फाउंडेशन गेल्या पंचवीस वर्षापासून दिव्यांग व्यक्तींचा विकासासाठी कार्य करत आहे आता ही संस्था स्वानंद सेवा सदन या इमारतीच्या रूपाने दिव्यांगाच्या पाठीशी भक्कमपणे उभा टाकेल असा विश्वासही राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी व्यक्त केला.

भालीवली गावातील सेवा विवेक या संस्थेने गावांमधील आदिवासी बांधवांना बांबूपासून विविध दैनंदिन उपयोगातील वस्तू बनविण्यासाठी प्रेरित केले आहे. संस्थेने या उद्योगाकडे स्थानिक गावकऱ्यांना आकर्षित करून स्थानिकांना अधिकाधिक रोजगार कशाप्रकारे देता येईल याकडे लक्ष केंद्रित करावे, असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

बांबू संवर्धनामध्ये तसेच बांबूपासून वस्तू बनविण्यामध्ये योगदान देणाऱ्या बांबू सेवकांना संस्थेमार्फत देण्यात येणारा बांबू सेवक हा पुरस्कार राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी खासदार राजेंद्र गावित, सर्वश्री आमदार हितेंद्र ठाकूर, राजेश पाटील, जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धराम सालिमठ, आदी उपस्थित होते.

# गॅस पाइपलाइन जोडणीचे उद्घाटन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

ऐरोली सेक्टर २ मधील घरगुती गॅस पाइपलाइन जोडणीचे उद्घाटन माजी आमदार संदीप नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. या गॅस पाइपलाइनचे काम तांत्रिक बाबींमुळे थांबले होते. स्थानिक माजी नगरसेविका शशिकला सुतार, ज्येष्ठ नगरसेवक अनंत सुतार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सदर काम मार्गी लागले.



या वेळी माजी आमदार संदीप नाईक म्हणाले की, नवी मुंबई शहर नियोजित शहर आहे. लोकनेते गणेश नाईक यांच्या माध्यमातून नवी मुंबईचा सर्वांगीण विकास झाला आहे. महानगर गॅसची जोडणी नागरिकांना उपलब्ध व्हावी यासाठी मनपा आणि रस्ते विभाग आदीकडे सातत्याने पाठपुरावा २००६ पासून सुरू होता. आज ऐरोलीकराना गॅस जोडणी मिळत आहे याचा आनंद आहे. दरम्यान, या वेळी रो हाऊस कॉलनीतील स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# जलतरणपटू नील शेकटकरचा विक्रम

## २६ किमीची खाडी पाच तास ३२ मिनिटांत केली पार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सानपाडा येथील १२ वर्षाच्या नील शेकटकर याने बेलापूर ते गेट वे ऑफ इंडिया हे अंतर बॅक स्ट्रोक पद्धतीने पाचतास ३२ मिनीटात पूर्ण केले. जलतरणातील नवीन विक्रम प्रस्थापीत केला असून यशाची गुढी उभारली आहे.




मराठी नववर्षाचे स्वागत वेगळ्या पद्धतीने करण्यासाठी नील शेकटकरने बेलापूर ते गेट वे ऑफ इंडीया हे अंतर बॅक स्ट्रोक पद्धतीने पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. शुक्रवारी (दि. १) मध्यरात्री १२.५४ ला बेलापूर खाडीतून पोहण्यास सुरुवात केली. पाच तास ५२ मिनीटात त्याने २६ किलोमीटरचे अंतर पूर्ण केले. हा नवीन विक्रम प्रस्थापित झाला आहे. यापूर्वी नीलने एलिफंटा ते गेट वे ऑफ इंडिया हे १५५ किलोमीटरचे अंतर दोन तास ४५ मिनिटांत पूर्ण केले होते.

या यशाबद्दल नीलचे अनेकांनी अभिनंदन केले. नील वाशीतील फादर ग्रेल स्वीमींग क्लबमध्ये प्रतिदिन चार ते पाच तास सराव करत आहे. आठवड्यातून एकवेळ उरणच्या समुद्रातही प्रशिक्षण घेत आहे. यामध्ये त्याला संदीप यादव, अमित आवळे, किशोर पाटील, गोकुळ कामत यांचे मार्गदर्शन लाभले.

# खारघरमध्ये आढळल्या प्राण्यांच्या अवयवांपासून बनविलेल्या वस्तू

## एक व्यक्ती ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

वन्य जीवांच्या शिकारीला बंदी असताना अवैध मार्गाने शिकारीचा सिलसिला सुरू असल्याचा सर्वात मोठा पुरावा पनवेलजवळील खारघरमध्ये सापडला आहे. येथील सेक्टर २१ मध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीकडे हस्तीदंत व वन्य जीवांच्या अवयवांपासून बनविलेल्या वस्तूंचे घबाड सापडले. या वस्तूंची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कोटी रुपयांची किंमत असल्याचे बोलले जाते. वन विभागाची ही सर्वात मोठी कारवाई असल्याची चर्चा आहे.

वन्य जीव अपराध नियंत्रण ब्युरो नवी मुंबई व दिल्ली यांना मिळालेल्या गुप्त बातमीवरून ही सर्वात मोठी कारवाई करण्यात आली आहे. गुप्त बातमीवरुन वन विभागाचे एसीएफ वाघमोडे, आरएफओ सोनवणे, परिमंडळ वन अधिकारी संजय पाटील, वन कर्मचारी यांनी खारघर सेक्टर २१ मध्ये धाड घालून एका व्यक्तीला ताब्यात घेतले आहे. त्याच्याजवळच कोटी रुपयांच्या वन्य जीवांच्या अवयवांपासून बनविलेल्या वस्तू सापडल्या आहेत. या व्यक्तीवर भारतीय वन्य जीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम ३९, ४८, ४९,५७, अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

हस्तीदंत व वन्य जीवांच्या अवयवांपासून बनविलेल्या वस्तू वनविभागाने जप्त केल्या आहेत तसेच या वस्तूंची फॉरेन्सीक टेस्ट करण्यासाठी त्या पुणे येथील लॅबमध्ये पाठविण्यात आल्या आहेत. प्राण्यांच्या अवयवांपासून देवदेवतांच्या मुर्ती, प्राण्यांचे शिल्प, बांगड्या, दागिने, शंख, दात, वेगवेगळ्या डिझाईन्स, छोटे डमरु, शोभिवंत वस्तू बनविण्यात आल्याचे दिसून येते.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. ४ एप्रिल २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ▪ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ▪ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

कोव्हॅक्सिन

- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१५+ व १८+)
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ )
- ९. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+)
- १०. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+)

कार्बेव्हॅक्स

- ११. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१२ ते १४)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

# कळंबोली सर्कल घेणार मोकळा श्वास

## मोठ्या प्रमाणात होणारी वाहतूक कोंडी सुटणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विविध राष्ट्रीय व राज्य महामार्ग आणि सेवा रस्त्यांशी जोडल्या गेलेल्या कळंबोली सर्कलवर नेहमीच होणारी वाहतूक कोंडीची समस्या काही वर्षांत दूर होणार आहे. केंद्रीय रस्ते व वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने झालेल्या बैठकीत या ठिकाणी तीन उन्नत मार्ग उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



जेएनपीटीतून दिवसाला शेकडो कंटेनर राज्यातील विविध औद्योगिक वसाहतींमध्ये ये-जा करतात. कंटेनरच्या प्रवासामधील अडथळा दूर करण्यासाठी कळंबोली सर्कलवरील वाहतूक कोंडी सोडविणे हे मोठे जिकरीचे झाले होते, मात्र या ठिकाणी एकत्र येणारे विविध मार्ग वेगवेगळ्या सरकारी यंत्रणांच्या अखत्यारीत येत असल्याने याबाबतचे नियोजन होणे कठीण बनले होते.

शीव-पनवेल महामार्ग हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे, तर यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग हा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ताब्यात आहे. द्रुतगती महामार्गाच्या खालून उरण येथे जाणारा मार्ग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या ताब्यात आहे. मुंब्रा-पनवेल महामार्ग हा पुणे येथील एमएसआरडीसीच्या कार्यालयाच्या देखरेखीखाली आहे, तर येथील सेवा रस्ते सिडको मंडळ आणि जवाहर औद्योगिक को-ऑप. सोसायटीच्या देखरेखीखाली येतो. वेगवेगळ्या यंत्रणांमध्ये समन्वय होत नसल्यामुळे याठिकाणी होणाऱ्या वाहतूक कोंडीला कोणीही वाली उरला नव्हता. या पार्श्वभूमीवर नितीन गडकरी यांनी पुढाकार घेऊन सर्व यंत्रणांची नुकतीच बैठक घेतली.

नवी दिल्ली येथे झालेल्या या बैठकीत गडकरी यांनी उरण व पनवेलमध्ये येणाऱ्या प्रकल्पांची माहिती घेऊन आगामी ३० वर्षांच्या वाहतुकीच्या ताणाबाबत प्रस्ताव बनवण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी कळंबोली सर्कल येथे आणखी तीन उन्नत मार्ग उभारण्याचा तसेच पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी भक्कम व्यवस्था उभारण्याचा प्रस्ताव तयार केला. यानुसार, पनवेल शहर आणि खांदेश्वर वसाहतींमधून निघणाऱ्या वाहनांना शीव-पनवेल मार्ग गाठण्यासाठी स्वतंत्र उड्डाणपुलाची मार्गिका उभारण्यात येणार आहे. त्यामुळे मुंब्रा-पनवेल महामार्गावरून वाहने न थांबता जेएनपीटी महामार्गाकडे रवाना होतील.

**आमदार प्रशांत ठाकूर यांचे विशेष प्रयत्न**

***कळंबोली येथील जंक्शनच्या वाहतूक कोंडीतून प्रवाशांची सुटका व्हावी यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नाने ८०० कोटी रुपयांचा कळंबोली जंक्शन विस्तारीकरण प्रकल्प होणार असून त्याचे भूमिपूजन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते रविवारी (दि. ३) झाले.***



# खारघरमध्ये फिटनेस आणि डान्स स्टुडिओचे उद्घाटन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर सेक्टर ६ येथे उभारण्यात आलेल्या आर्क ९०९ या फिटनेस आणि डान्स स्टुडिओचे उद्घाटन शनिवारी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल तथा भाजपचे ज्येष्ठ नेते राम नाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार जयप्रकाश ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना भाजप नेते राम नाईक यांनी खारघर या मोठ्या शहरात आपण फिटनेस आणि डान्सचे धडे उत्तमरित्या द्याल आणि खारघरमधूनच नव्हे; तर पनवेल, कामोठे, कळंबोलीसह नवी मुंबईतूनही आपल्याकडे फिटनेस आणि डान्सच्या प्रशिक्षणासाठी लोक मोठ्या संख्येने येतील, असा आशावाद व्यक्त केला.

लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनीही श्वेता मेढेकर आणि त्यांच्या व्यावसायिक भागीदारांना शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्याला महापालिकेचे स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, नगरसेवक रामजी बेरा, भाजप खारघर शहराध्यक्ष ब्रिजेश पटेल, दीपक शिंदे, कीर्ती नवघरे, अमर उपाध्याय, समीर कदम, गीता चौधरी उपस्थित होते.

## नवीन पनवेलमध्ये आज नवीन पाइपलाइनचे होणार उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल सेक्टर १३मधील ए टाईप चाल क्रमांक ४, १५, ३३, ४० आणि ४१मध्ये पिण्याच्या पाण्याच्या नवीन पाइपलाइनचे काम भाजपच्या नगरसेविका सुशिला जगदीश घरत यांनी स्वखर्चातून केले असून या कामाचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. ४) रात्री ८ वाजता करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे शहराध्यक्ष जयंत पगडे, माजी नगराध्यक्ष सुनील घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, मनोज भुजबळ, नगरसेविका अ‍ॅड. वृषाली वाघमारे, ज्येष्ठ कार्यकर्ते सी. सी. भगत, भाजप महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष वर्षा नाईक, माजी नगरसेवक के. डी. म्हात्रे, प्रभाग अध्यक्ष विजय म्हात्रे, रवींद्र भगत आदी उपस्थित राहणार आहेत.





**पनवेल : शिवाजीनगर येथील शशिकांत ठाकूर यांच्या नवीन घराची वास्तुशांती शनिवारी झाली. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शशिकांत ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी सागर ठाकूर, विराज ठाकूर आदी उपस्थित होते.**



**खारघर : सेक्टर ३४ येथे नव्याने सुरू झालेल्या मल्हार फिटनेस स्टुडिओच्या दुसऱ्या ब्रँचचे उद्घाटन गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर करण्यात आले. या फिटनेस सेंटरला पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक हरेश केणी, पापा पटेल आदींनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.**





**पनवेल : मराठी नववर्ष अर्थातच गुढीपाडव्यानिमित्त येथील महात्मा गांधी मार्ग येथे बुरूड समाजातर्फे, बंदर रोड येथील ओमकारेश्वर मंदिरात आणि वाल्मिकीनगर येथे श्री सत्यनारायणाच्या महापुजेचे आयोजन करण्यात आले होते. महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी त्या ठिकाणी जाऊन दर्शन घेतले. या वेळी भाजप शहर सरचिटणीस व नगरसेवक नितीन पाटील तसेच अभिजित जाधव, चेतन जाधव उपस्थित होते.**

# वावंजेत सहारा फार्म आणि रिसॉर्टचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील वावंजे येथे उभारण्यात आलेल्या सहारा फार्म आणि रिसॉर्टचे उद्घाटन शनिवारी (दि. २) गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या उद्घाटन सोहळ्याला भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सरचिटणीस प्रल्हाद केणी, उपाध्यक्ष वासुदेव घरत, एकनाथ देशेकर, निर्दोष केणी, प्रभाकर जोशी, विनोद घरत, गजानन घरत, साजिद पटेल, राजू घरत आदी मान्यवर उपस्थित होते. महेंद्र कृष्णा घरत यांनी नव्याने सुरू केलेल्या या व्यवसायाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले आणि त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.





उद्घाटनानंतर भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी कार्यक्रमस्थळी भेट घेतली. या वेळी भाजप उपाध्यक्ष वासुदेव घरत, खारघर शहर अध्यक्ष विनोद घरत, माजी सरपंच महेंद्र घरत, भाजप युवा नेते शुभ पाटील, राजेंद्र घरत आदी उपस्थित होते.

सहारा फार्म आणि रिसॉर्टमध्ये वाढदिवस समारंभ, लग्न समारंभ, इव्हेंट, पार्टी इत्यादी कार्यक्रम आयोजित करता येऊ शकतात. या फार्मची युट्यूब लिंक saharafarm&resort अशी असून हे फार्म वावंजे (निताळे) खानाचा बंगला येथे आहे.

# ब्राह्मण सभेचा वर्धापन दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ब्राह्मण सभा, नवीन पनवेल या संस्थेचा वर्धापन दिन सोहळा पनवेल येथील फडके नाट्यगृहामध्ये मोठ्या उत्साहात झाला. यानिमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रम झाले.

दीपप्रज्वलनानंतर अध्यक्ष दीपाली जोशी यांनी उपस्थिताना संबोधित केले. ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार आणि राज्यनाट्य परिक्षण समिती सदस्य शामनाथ पुंडे, भरतनाट्यम विशारद सई जोशी, राज्य नाट्यपुरस्कार विजेती पल्लवी देशपांडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.



सभासद कलाकारांनी गणेशवंदना, लेझीम, नृत्य, गायन आदी कलाप्रकारांचे सादरीकरण केले. त्यानंतर मोहन हिन्दुपूर दिग्दर्शित तिमिरातुनी तेजाकडे हा संगीतप्रधान नाट्याविष्कार झाला. अथर्व देव यांनी ऑर्गन आणि अमोल खासनिस यांनी तबलासाथ केली, तर प्रकाशयोजना मिलिंद मोघे यांची होती.

शामनाथ पुंडे व स्वप्ना अत्रे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. संस्थेच्या अध्यक्ष दिपाली जोशी, सचिव मंजुषा भावे, खजिनदार वैशाली सरदेशपांडे यांच्यासह कार्यकारिणी, विभाग प्रतिनिधी व सभासदांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.



**पनवेल : रोटरी क्लब ऑफ बिझनेस एमराल्ड, मानसरोवरच्या वतीने धाकटा खांदा येथील श्री गणेश विद्या मंदिर प्राथमिक शाळेत रविवारी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात नागरिकांच्या विविध चाचण्या झाल्या. या उपक्रमास नगरसेवक मनोहर म्हात्रे तसेच सुरेश टेंबे, भास्कर भगत, अर्जुन भगत, रवींद्र डोंगरे, संजय पाटील, विनोद भगत, भगवान पाटील, एकनाथ पाटील, परशुराम डोंगरे, सुकाजी भगत, नितेश म्हात्रे आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## खारघरमधून महिला बेपत्ता

**खारघर :** येथील बेलपाडा सेक्टर ३ येथील देवकीनंदन निवास येथे राहणारी एक २७ वर्षीय महिला शुक्रवारी (दि. १) बेपत्ता झाल्याने तिच्या कुटुंबीयांनी ती हरविल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात दिली आहे. पोलीस या बेपत्ता महिलेचा शोध घेत आहेत. आरती विजयदीप विश्वकर्मा (वय २७) असे बेपत्ता महिलेचे नाव असून तिची उंची पाच फूट, रंग गोरा असून तिच्या डाव्या हातावर ओम असे गोंदलेले आहे. तिने लाल साडी नेसलेली आहे. या महिलेबाबत कोणास माहिती असल्यास त्यांनी विजयदीप (९९३०५७६८८१४), अमरदीप (९८३३९६९९७२), मनोज (७०२१२६३३८४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १५

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. जीएसटीचे सर्वाधिक १.४२ लाख कोटी रुपये संकलन केव्हा झाले आहे?**

- ***अ.*** जानेवारी २०२२ ***आ.*** मार्च २०२२
- ***इ.*** मार्च २०२१ ***ई.*** मार्च २०२०

**२. जगातील सुमारे शंभर देशांना मोटारींची निर्यात करणारी भारतीय कंपनी कोणती?**

- ***अ.*** टाटा मोटर्स ***आ.*** बजाज
- ***इ.*** मारुती सुझुकी ***ई.*** महिंद्रा अँड महिंद्रा

**३. स्मॉल सेव्हिंग योजनांमध्ये सर्वाधिक(७.४० टक्के) व्याज देणाऱ्या योजनेचे नाव काय?**

- ***अ.*** सिनियर सिटीजन सेव्हिंग स्कीम ***आ.*** पब्लिक प्रोव्हीडट फंड
- ***इ.*** किसान विकास पत्र ***ई.*** नॅशनल सेविंग सर्टिफिकेट






**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# राज ठाकरेंची गर्जना

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी गुढीपाडव्यानिमित्त शिवाजी पार्क येथे आयोजित मेळाव्यात आपली आगामी वाटचाल स्पष्ट केली. या वेळी त्यांनी मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या दुटप्पी भूमिकेवर प्रहार करीत हिंदुत्वाच्या दिशेने एक पाऊल आणखी पुढे टाकले. त्यांच्या भाषणाची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

**कोरोनाचा संसर्ग आटोक्यात आल्यानंतर शिवाजी पार्क मैदानात दोन वर्षांनंतर 'राज'गर्जना झाली. मनसेच्या मेळाव्यात बोलताना अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपल्या खास शैलीत जोरदार फटकेबाजी केली. या वेळी त्यांचा स्पष्ट रोख ठाकरे सरकारवर होता. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाबाबत अडीच-अडीच वर्षे असा फॉर्म्युला ठरलेला नसताना उद्धव ठाकरे यांनी अडचणीची राजकीय परिस्थिती पाहून आपली भूमिका बदलून कशी सत्ता हस्तगत केली याचा राज यांनी ऊहापोह केला. २०१९च्या विधानसभा निवडणूक प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या राज्यात सभा झाल्या. तेव्हा युतीकडून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेही व्यासपीठावर उपस्थित असायचे. त्या वेळी मोदी-शाहांनी देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री होतील, असे जाहीरपणे वारंवार सांगितले. त्यावर उद्धव ठाकरे त्यावर काही बोलले नाहीत. निवडणुकीनंतर मात्र त्यांनी युतीमध्ये अडीच-अडीच वर्ष मुख्यमंत्रीपद वाटून घ्यायचे होते असे आधी ठरले होते, सांगत या पदावर हक्क सांगितला. खरेच अशा प्रकारे ठरलेले होते तर मग जेव्हा भाजप नेते हे फडणवीसच मुख्यमंत्री होतील असे सांगत असताना तेव्हा उद्धव ठाकरे काहीच का बोलले नाहीत? निवडणुकीनंतर त्यांना कसा साक्षात्कार झाला? असा खडा सवाल राज यांनी करून उद्धव आणि त्यांच्या शिवसेनेला उघडे पाडले. ते एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी शिवसेनेच्या राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेससोबत जुळविलेल्या नव्या घरोब्यावरूनही निशाणा साधला. एक नंबरचा पक्ष भाजप, दुसरा शिवसेना, तिसरा राष्ट्रवादी. तिसऱ्या नंबरचा पक्ष पहिल्या नंबरला भुलवतोय. नंतर दोन नंबरच्या पक्षाबरोबर सलगी करतो, अशी मार्मिक शब्दांत त्यांनी टिपण्णी केली. शिवसेनेने हिंदुत्व गुंडाळून काँग्रेस-राष्ट्रवादीची सोयरिक जुळविल्याने आता मनसेने हिंदुत्वाचा मुद्दा प्रखरतेने हाती घेतला असून यावरूनही राज यांनी अनेक विषय उपस्थित केले. त्यातील सर्वच समर्थनीय नसले तरी राज हे स्पष्ट वक्ते म्हणून ओळखले जातात. सध्या राज्यातील सरकारचे जनतेला वाऱ्यावर सोडून, अनेक प्रश्नांचे घोंगडे भिजत ठेवून जे नसते उद्योग सुरू आहेत त्यावर राज यांची तोफ धडाडली हे लोकशाहीच्या दृष्टीने योग्यच झाले. नाही तर एरवी भाजपने सरकारच्या एखाद्या गोष्टीवर आक्षेप नोंदविला की सरकारमधील तिन्ही पक्षांची मंडळी आपण कसे बरोबर आणि भाजप कसे चुकीचे हे छाती बडवून सांगतात. आताही आघाडीतील नेते राज यांच्यावर तुटून पडल्याने आश्चर्य ते काय, परंतु त्यामुळे राज यांना काही फरक पडणार नाही. महाराष्ट्रातील जनतेने शिवसेनेला राष्ट्रवादी आणि काँग्रेससोबत जाण्यास साथ दिली नाही. उद्धव ठाकरेंनी जनतेचा विश्वासघात केला आहे. जनतेचा विश्वासघात करणाऱ्या नेत्यांना जनता धडा शिकवेल, असा इशारा याच राज यांनी दिला आहे. आगामी काळात ते या विश्वासघातकी मुख्यमंत्री आणि सरकारची वाट कशी लावतात हे पाहणे रंजक आणि तितकेच औत्सुक्याचे ठरेल.**

# शासकीय विश्रामगृहांची दुरुस्ती संपता संपेना!





## खबरबात
**संतोष पेरणे**

शासनाच्या कामासाठी दौऱ्यावर असलेले अधिकारी आणि मंत्री, लोकप्रतिनिधी यांच्यासाठी काही काळ विश्रांती घेण्यासाठी आणि चर्चा करण्यासाठी हक्काची जागा असावी यासाठी प्रत्येक तालुका स्तरावर शासनाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून शासकीय विश्रामगृहे बांधली आहेत. त्या धर्तीवर कर्जत तालुक्यात माथेरान येथे पर्यटनस्थळ म्हणून दोन तर कर्जत येथे एक आणि कळंब येथे मुरबाड रस्त्यावर स्टोअर रूम बांधले होते. आज या सर्व शासकीय वास्तूंची अवस्था भयावह अशी झाली आहे. शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि मंत्री यांच्यासाठी आरक्षित असलेली कर्जत तालुक्यातील ही सर्व शासकीय विश्रामगृहे दुरुस्तीच्या कामामुळे अनेक वर्षे बंद ठेवली आहेत. सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारी या विश्रामगृहांची किती वर्षे दुरुस्ती करणार आहेत? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

कर्जत तालुक्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने १९७८मध्ये बांधलेल्या शासकीय विश्रामगृहाला अवकळा आली आहे. गेली तीन वर्षे हे विश्रामगृह दुरुस्तीच्या नावाखाली बंद आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेल्या या विश्रामगृहाला 'गुलमोहर' या वृक्षाचे नाव देण्यात आले होते. मात्र आजचा विचार करता त्या विश्रामगृहात गुलमोहराचे एकही झाड नाही. एक एकरचा मोठा विस्तीर्ण परिसर असलेल्या या विश्रामगृहाचा वापर रस्त्याच्या कडेला असल्याने शासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडून निवडणूक काळात होत होता, मात्र गेली अनेक वर्षे विश्रामगृहाची सुरू असलेली दुरुस्तीची कामे संपत नाहीत. गेल्या १५ वर्षांत किमान पाच वेळा या विश्रामगृहाच्या दुरुस्तीचे काम मंजूर करण्यात आले आहे. त्यात दुरुस्तीचे एक काम पूर्ण झाल्यावर वर्ष लोटण्याआधी काही महिन्यांत पुन्हा त्याच विश्रामगृहाच्या दुरुस्तीची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रस्तावित केली जातात.

या परिसरातील जुनी झाडे नामशेष झाली असून एवढ्या मोठ्या जागेत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून साधे उद्यानदेखील विकसित केले गेले नाही. कर्जत नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी



निवडणूक निरीक्षक यांच्यासाठी आरक्षित केले होते. त्यानंतर फेब्रुवारी २०१९ पासून हे शासकीय विश्रामगृह दुरुस्तीच्या कामासाठी बंद आहे. त्यानंतर झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी राज्य आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निरीक्षक यांना देखील हे शासकीय विश्रामगृह नादुरुस्त असल्याने देण्यात आले नव्हते.

शासकीय विश्रामगृहाची वास्तू अनेक वर्षे दुरुस्त करण्याचे काम करूनदेखील दुरुस्ती झालेली नाही आणि त्यामुळे मागील १० वर्षांत सार्वजनिक बांधकाम खात्याने या विश्रामगृहाच्या दुरुस्तीच्या कामावर किती खर्च केला आणि तरीदेखील कामे पूर्ण होत नाहीत? याची चौकशी करण्याची मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते प्रभाकर गंगावणे यांनी केली आहे. या विश्रामगृहात एक व्हीआयपी तर तीन साधे सूट असून खानसामा आणि कामगार खोलीदेखील आहे. गेल्या सहा वर्षांपूर्वी या विश्रमगृहाच्या छताला गळती लागल्याने त्यावर पत्र्याचे छप्पर टाकण्यात आले आहे. मुबलक पाणी असूनदेखील परिसर हिरवागार नाही. माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी शासनाने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दोन विश्रामगृह बांधली आहेत. त्यातील 'माउंट बंगलो'हा माथेरानमधील सर्वाधिक उंचीवर असलेला बंगला म्हणून ओळखला जातो. उंचावर आणि बाजारपेठ भागापासून दूर असलेले हे विश्रामगृह सर्वांचे आवडीचे बनले होते. निरव शांतता आणि दगदगीच्या जीवनापासून दूर असलेल्या माउंट बंगलोसाठी मुंबईकरांचे प्राधान्य असायचे. येथे शासकीय कर्मचारी आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांच्या राहण्याची व्यवस्था होत असते, मात्र माथेरानमधील हे विश्रामगृह सातत्याने दुरुस्तीच्या कामासाठी बंद असते. त्यामुळे लोकप्रतिनिधी, अधिकाऱ्यांना कधी विश्रांतीसाठी यायचे झाले तरी उपलब्ध होत नाही.

माथेरानमध्ये एमजी रोडवर इन्स्पेक्शन बंगला असून हा बंगलादेखील सार्वजनिक बांधकाम खात्याकडून विश्रामगृह म्हणून विकसित करण्यात आला होता, मात्र गेल्या अनेक वर्षांपासून येथील निवास व्यवस्था ढासळली आहे. शहरात पायाभूत सुविधांचे जाळे विकसित करण्याचे काम करणाऱ्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी हा बंगला दिला असल्याचे बोलले जात आहे. प्राधिकरण काही वर्षांनंतर येथून विकासकामे पूर्ण करून जाणार आहे. त्यामुळे माथेरानमधील इन्स्पेशन बंगलो ही वास्तू शासनाने अन्य कोणत्याही यंत्रणेला देण्याची आवश्यकता नाही, असे मत माथेरानमधील एका बंगल्याच्या निमित्ताने पुढे येत आहे.

नाशिक भागातून कर्जतकडे आणि पुढे लोणावळा, अलिबाग भागात जाणारे सरकारी अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्यासाठी काही काळ विश्रांती घेता यावी मुरबाड-कर्जत रस्त्यावर कळंब येथे सार्वजनिक बांधकाम विभागाने स्टोर रूम बांधले होते. आजही ती वास्तू नादुरुस्त अवस्थेत असून शासनाने अशा पद्धतीने विश्रामगृहे बंद ठेवण्याची परंपरा निर्माण केल्याने शासकीय वस्तूंची अडगळीत पाडल्या जाण्याचे हे कारस्थान आहे काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# दिव्यदृष्टीसाठी समर्पित : डॉ. हार्दिक पारिख

लहानपणी रेडिओवर सकाळी सकाळी अभंग ऐकत ऐकत लहानाचा मोठा झालो. पुढे वाचन, लेखन सुरू झाले आणि अनेक गोष्टी सहज साध्य वाटू लागल्या. कवितेची आवड असल्याने अनेक विषयांवर कविता वाचनाचा छंद जडला. शासकीय नोकरीत दिवसाचे तास लक्षात न ठेवता, वाढत्या वयाचा विचार न करता हळूहळू शारिरीक व्याधी सुरू झाल्या. मधूमेह, उच्च रक्तदाब यांसारख्या श्रीमंती आजारासोबतच डोळ्यांच्या विकाराने त्रस्त होऊ लागलो. २८ मार्च २०२२ रोजी रत्नागिरीच्या मांडवी समुद्रावर निश्चय केला आणि डोळ्यांवर उपचार करण्याचे ठरविले. नंतरच्या मार्च महिन्यातील कामात, अर्थसंकल्पीय अधिवेशन, ऑफीस यामुळे डोळ्यांकडे पुन्हा दुर्लक्ष झाले आणि त्रास अधिकच वाढला. रात्रीचे गाडी चालविणे बंद झाले. वाचन, लिखाणावर परिणाम होऊ लागला. चष्मा असूनही त्रास होत होता.

मंत्रालयात एका शासकीय बैठकीनंतर आमचे मोठे बंधू वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश धुमाळ यांचा फोन आला आणि भेटण्याचे निश्चित झाले. घरातून बाहेर पडताना केवळ डोळे दाखवून येतो म्हणून बाहेर पडलो होतो, मात्र घाटकोपर येथे 'ग्लोबल आय क्लिनिक' येथे डॉ. हार्दिक पारिख या मुंबईतील सर्वोत्कृष्ट नेत्रचिकित्सकाची भेट झाली. काही क्षणात त्यांच्यातील माणुसकी आणि व्यवसायाबद्दल असणारी अढळ निष्ठा लक्षात आली. कामातील 'प्रोफेशनल पद्धत' पाहून लगेच निर्णय घेतला. २० मिनिटांच्या शस्त्रक्रियेनंतर आम्ही खूप वेळ गप्पा मारल्या.

डॉ. पारिख यांनी २००३ मध्ये मुंबईच्या टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएस पूर्ण केले. नंतर बंगलोर येथील राजीव गांधी आरोग्य विद्यापीठात एमएस



ही पदवी घेतली. त्यांनी सुपर स्पेशालिटी म्हणून कॉर्निया आणि लॅसिकची निवड केली. कोहिमतूर येथील अरविंद आय हॉस्पिटलमध्ये त्यांना फेलोशिप मिळाली. या काळात दोन हजारांहून अधिक मोतिबिंदू शस्त्रक्रिया आणि ३००हून अधिक कॉर्निया आणि लॅसिक शस्त्रक्रिया केल्या. मुंबईच्या ओजस आय हॉस्पिटलमध्ये कॉर्निया आणि लॅसिक सल्लागार म्हणून ते काम पाहत होते. गेली सात वर्षे ग्लोबल क्लिनिकमध्ये ते स्वत:ची प्रॅक्टीस करीत आहेत.

लेसिक म्हणजे लेझर शस्त्रक्रिया किंवा लेझरने दृष्टी सुधारणे म्हणतात. मी पुन्हा त्यांना फॉलोअपसाठी भेटलो, तेव्हा माझे कुटुंबिय सोबत होते. माझ्या शस्त्रक्रियेबद्दल कुटूंबियांच्या मनात असंख्य प्रश्न होते. अचानक घेतलेल्या निर्णयाबद्दल माझ्यावर आश्चर्य आणि रागही होता, पण डॉक्टरांची भेट झाल्यानंतर साऱ्या प्रश्नांची उत्तरे मिळाली आणि एक नवीन दिशा घेऊन घरी परतलो. आमचे प्रश्न आणि त्यांची शास्त्रीय उत्तरे केवळ संवाद न राहता माहिती कशाप्रकारे सोपी करून सांगावी हे माझ्यासाठी प्रशिक्षण होते.

परतीच्या प्रवासात भा. रा. तांबे यांचे, डोळे हे जुलमी गडे, रोखून मज पाहू नका यापासून ग. दि. मांडगुळकर यांच्या, डोळ्यात वाच माझ्या तू गीत भावनांचे, सादविना कळावे संगीत लोचनांचे, राजा बढे यांचे डोळे मोडित गवळण राधा, मधुसूदन कालेलकरांचे डोळे माझे त्यात तुझे रुप कसे, बा. भ. बोरकरांच्या, डोळे तुझे बदामी देते तुला सलामी, अशी अनेक मराठी गाणी आठवत होती. हिंदी चित्रपटांच्या गाण्यांसाठीच डोळे निर्माण झाले की काय, अशी शंका मनात येते. तेरे आँखों की सिवा दुनिया में, अखियोंको रहने दो, खून से मिली नजर, आँखों की गुस्ताखियाँ माफ हो, आँखो में तेरी अजब सी अदाएँ है, तेरे नैन बडे दगाबाज रे, सुरीली अंखियों वाले सुना है, तेरी अंखियों में, कत्थई आँखों वाली एक लडकी, मेरे मस्त मस्त दो नैन, तेरे नैना हंस दिए, तेरी काली अंखियों से जिंद मेरी जागे, ये काली काली काली आँखे आणि शेवटी आँख है भरी भरी और तुम... अशीही गाणी आठवली. रात्री मोबाईल, टिव्ही बंद असल्याने केवळ डोळे या विषयावर संगीत ऐकत पडलो. हा अनुभवही माझ्यासाठी भारी होता.

डोळ्यांचे आरोग्य अधिक चांगले ठेवण्यासाठी तज्ज्ञ आवश्यक असतात. याशिवाय असं म्हणतात की, सगळ्यांकडे दोन डोळे आहेत, पण सगळ्यांना एकसारखे दृश्य दिसतेच असे नाही. आपणासही काही समस्या असतील तर एकदा डॉ. हार्दिक पारिख यांच्या ग्लोबल आय क्लिनिकला आवश्यक भेट द्या. त्यांच्या वेबसाईटचा पत्ता www.globaleyeclinic.com असा आहे. पूर्वभेट निश्चित करण्यासाठी ०२२-२५१२७७४४/२५१२७७५५ या क्रमांकावर संपर्क करू शकता. हे त्यांचे प्रमोशन नाही, परंतु जे चांगले आहे ते गरजू लोकांना समजले पाहिजे म्हणून हा प्रयत्न!

**-शब्दांकन : डॉ. गणेश मुळे, नवी मुंबई**

## बदलते तंत्रज्ञान

# आता लॅपटॉपवरूनसुद्धा करता येणार व्हॉट्सअ‍ॅप व्हिडीओ कॉल

लाखो भारतीय व्हॉट्सअ‍ॅप वापरतात. व्हॉट्सअ‍ॅपवर ऑडिओ कॉलचा वापरही पुरेसा आहे. कोरोनामुळे या सुविधेची लोकप्रियता सातत्याने वाढत आहे. कंपनीने आता त्यांच्या डेस्कटॉप अ‍ॅपमध्ये व्हिडीओ कॉल सुविधाही सुरू केली आहे. आता व्हॉट्सअ‍ॅप डेस्कटॉप अ‍ॅप वापरकर्ते काही स्टेप्स फॉलो करून तुम्ही तुमच्या लॅपटॉप किंवा पीसीद्वारे व्हिडीओ कॉल करण्याचा आनंद घेऊ शकतात, पण व्हॉट्सअ‍ॅप वेब वापरकर्त्यांना अद्याप व्हिडीओ कॉलची सुविधा मिळालेली नाही. तुम्हाला लॅपटॉप किंवा डेस्कटॉपवरून व्हॉट्सअ‍ॅप व्हिडीओ कॉल करायचा असेल, तर या स्टेप्स फॉलो करा.



प्रथम तुम्हाला तुमच्या लॅपटॉपवर किंवा विंडोज किंवा मॅकओएसवर चालणाऱ्या लॅपटॉपवर व्हॉट्सअ‍ॅप डेस्कटॉप अ‍ॅप डाउनलोड करावे लागेल. असे करण्यासाठी फक्त अ‍ॅप डाउनलोड करा आणि तुमच्या लॅपटॉप किंवा पीसीवर स्थापित करा. वापरकर्ता नाव आणि फोन नंबर यांसारख्या तुमच्या क्रेडेन्शियल्ससह लॉग इन करा तसेच हे व्हॉट्सअ‍ॅप डेस्कटॉप फक्त विंडोज १० ६४-बिट, आवृत्ती १९०३ किंवा नवीन आणि मॅकओएस १०.१३ किंवा नवीन आवृत्तीवर व्हिडीओ कॉलला सपोर्ट करेल. ग्रुप व्हिडीओ कॉल क्षमतेला सपोर्ट करणाऱ्या अ‍ॅपच्या मोबाइल आवृत्तीच्या विपरीत ते फक्त एक ते एका व्हिडीओ कॉलला सपोर्ट करते.

वर नमूद केल्याप्रमाणे विंडोज किंवा मॅकसाठी व्हॉट्सअ‍ॅप डेस्कटॉप अ‍ॅप इन्स्टॉल करा.

साइन इन करण्यासाठी तुमच्या फोनवरून तुमच्या लॅपटॉपवर क्यूआर कोड स्कॅन करा. डेस्कटॉपवर तुमचे व्हॉट्सअ‍ॅप खाते उघडल्यानंतर चॅट उघडा आणि वरच्या उजव्या कोपऱ्यात असलेल्या व्हिडीओ कॉल आयकॉनवर क्लिक करा. तुम्ही एक संपर्क निवडू शकता आणि तुमच्या डेस्कटॉपवरून व्हॉट्सअ‍ॅप व्हिडीओ कॉल करू शकता.

लक्षात ठेवा की, डेस्कटॉपवर व लॅपटॉपवर व्हॉट्सअ‍ॅप व्हिडीओ कॉल करण्यासाठी काही किमान आवश्यकता आहेत. यामध्ये ऑडिओ आउटपुट डिव्हाइस आणि मायक्रोफोन, बाह्य किंवा इनबिल्ट वेबकॅम आणि सक्रिय इंटरनेट कनेक्शन समाविष्ट आहे.

## आरोग्य प्रहर

# मधुमेहींनी 'या' पाच फळांपासून राहा लांब

तुम्ही अत्यंत निरोगी आहात, नियमित व्यायाम करीत आहात, तुमचे शरीर अत्यंत तंदुरुस्त आहे, असे असल्यास फळे तुम्हाला एखाद्या वरदानापेक्षा कमी नाहीत. शरीरासाठी फळे अतिशय महत्त्वपूर्ण ठरत असतात. उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले असल्याने या दिवसांमध्ये जेवण कमी होत असते. अशा वेळी तुम्ही फळांद्वारे स्वत:ला हायड्रेड ठेवू शकतात. हे झाले निरोगी व्यक्तीबाबत, परंतु तुम्हाला साखरेची समस्या असेल, तुम्ही मधुमेही असाल तर मात्र तुम्ही काही फळांपासून लांब राहणेच योग्य असते, कारण या फळांमधील साखर तुमच्या रक्तातील साखरेची पातळी अधिक वाढवू शकते. त्यामुळे हे फळे तुमची मधुमेहाची समस्या अधिक वाढवू शकतात. यात प्राकृतिक पद्धतीची साखर असल्याने याचा शरीरावर दुष्परिणाम होउ शकतो.

**टरबूज :** उन्हाळ्यात टरबूजाची मोठ्या प्रमाणात आवक होत असते. साधारणत: १०० ग्रॅम टरबूजमध्ये ३० कॅलरी असतात, तर ०.४ ग्रॅम डाईटरी फायबरचे प्रमाण असते. यात कॅलरी जास्त नसल्या तरी यात प्राकृतिक पद्धतीची साखर असते. १०० ग्रॅम टरबूजमध्ये सारधात: ६.२ ग्रॅम साखरेचे प्रमाण असते. शरीराला रोज फक्त ५ ग्रॅम साखरेची आवश्यकता असते. आपण दिवसाला साधारणत: एक वाटीदेखील टरबूज खाल्ले तरी त्यातून १२ ग्रॅम साखर शरीराला मिळते व ही मधुमेहींसाठी घातक ठरु शकते. त्यामुळे साखरेचा त्रास असलेल्यांनी टरबूजपासून लांबच रहावे.

**केळी :** मधुमेहींसाठी केळी अत्यंत घातक आहे. केळीमध्ये प्राकृतिक पद्धतीने मोठ्या प्रमाणात साखर असते. साधारणत: १०० ग्रॅम केळीत १२.२३ ग्रॅम इतक्या मोठ्या प्रमाणात साखर असते. शिवाय केळीचा ग्लाईसेमिक इंडेक्सदेखील ५१ च्या घरात आहे. त्यामुळे मधुमेहींनी केळीपासून लांब रहावे.

**द्राक्ष :** द्राक्षांमध्येही मोठ्या प्रमाणात साखर असते. साधारणत: १०० ग्रॅम द्राक्षांमध्ये १५.४८ ग्रॅम इतक्या मोठ्या प्रमाणात साखर असते. त्यामुळे मधुमेही लोकांसाठी द्राक्ष घातक ठरु शकतात. द्राक्षांचा ग्लाईसेमिक इंडेक्सदेखील ५३ इतका आहे. द्राक्ष खाल्ल्यानंतर आपल्या रक्तातील साखरेचे प्रमाण अत्यंत वेगाने वाढत असते.

**आंबा :** १०० ग्रॅम साखरेत १३.७ ग्रॅम साखरेचे प्रमाण असते. ग्लाईसेमिक इंडेक्सदेखील ५१ च्या घरात आहे. त्यामुळे मधुमेही लोकांसाठी आंबा हा घातक समजला जातो.

**चिकू :** १०० ग्रॅम चिकुमध्ये तब्बल २०.१४ ग्रॅम साखरेचे प्रमाण असते. हे सर्वाधिक प्रमाण मधुमेहींच्या आरोग्यासाठी चांगले नाही. ग्लाईसेमिक इंडेक्सदेखील ५३ इतका आहे. त्यामुळे हे फळसुद्धा मधुमेहींना टाळायला हवे.



**क्लिक...क्लिक...!**

**मुरूड : उन्हाच्या झळा वाढू लागल्याने असह्य होऊ लागले आहे. अशा वेळी गरिबांचा फ्रीज अर्थात माठाला वाढती मागणी आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

# नेरळमधील पाण्याची समस्या कधी सुटणार?

## नेरळ प्राधिकरणचे अतिरिक्त जलवाहिनी टाकण्याचे काम जि.प.ने केले रद्द



**कर्जत : बातमीदार**

नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील अतिरिक्त जलवाहिनी टाकण्याचे काम नेरळ विकास प्राधिकरणाने मंजूर केले होते आणि ते जलवाहिनी टाकण्याचे काम जिल्हा परिषदेने रद्द केले आहे. दुसरीकडे त्याच नेरळ प्राधिकरणामध्ये असलेल्या कोल्हारे ग्रामपंचायतीमध्ये दोन निविदा मंजूर केल्या जात असताना रायगड जिल्हा परिषदेचे त्याकडे लक्ष नाही का, असा सवाल उपस्थित होत असून यामुळे नेरळमधील पाण्याची मुख्य समस्या सोडवण्याबाबत दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही होत आहे.

मागील दोन महिन्यांपासून कर्जत तालुक्यातील कोल्हारे या नेरळ विकास प्राधिकरणाचा भाग असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये पाण्याचे वितरण करण्यासाठी जलवाहिन्या टाकल्या जात आहेत. त्याबद्दल ३० मार्च रोजी झालेल्या ग्रामसभेत स्थानिक ग्रामपंचायत सदस्य विजय हजारे यांनी माहिती मागितली असता सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. मात्र त्याच ग्रामपंचायत प्रशासनाकडून आता एप्रिल महिना सुरू झाल्यावर दोन अंदाजपत्रके मंजूर असून जलवाहिनी टाकण्याच्या कामाच्या निविदा देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे कोल्हारे ग्रामपंचायतीच्या कारभाराची दखल रायगड जिल्हा परिषदेने घेण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया ग्रामपंचायत सदस्य विजय हजारे यांनी व्यक्त केली आहे.

त्या त्या भागात पाण्याचे वितरण करण्यासाठी कोल्हारे ग्रामपंचायतीला जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागाने प्रशासकीय मान्यता कशी दिली? त्याच जिल्हा परिषदेकडून नेरळ विकास प्राधिकरणमधील नेरळ गावातील ५० लाख खर्चाची अतिरिक्त जलवाहिनी टाकण्याचे काम पाणीपुरवठा विभागाने रद्द केले होते. त्यामुळे नेरळ विकास प्राधिकरणामध्ये जिल्हा परिषदेची भूमिका परस्पर विरोधी कशी? असा प्रश्न कोल्हारे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच रामदास हजारे यांनी उपस्थित केला आहे.

**नेरळ प्राधिकरण हद्दीतील गावांसाठी ४५ कोटींची नळपाणी योजना प्रस्तावित असून ती योजना लवकरच मंजूर होणार आहे. त्यामुळे एकीकडे नेरळ या शहरी भागाला निर्माण होत असलेली पाण्याची अडचण दूर करण्यासाठी मंजूर केलेली आणि कामाचे कार्यादेश दिलेली जलवाहिनी टाकण्याचे काम जिल्हा परिषद रद्द करते, तर त्याच प्राधिकरणामध्ये असलेल्या कोल्हारे ग्रामपंचायतीला सूट कशासाठी? जिल्हा परिषदेच्या या परस्परविरोधी भूमिकेबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.**

# कौटुंबिक वादातून महिलेने तीन चिमुकल्यांना घेऊन सोडले घर







**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातून बेपत्ता होणाऱ्यांची संख्या चिंताजनक आहे. तालुक्यातील शिळोशी आदिवासीवाडी येथील एका महिला कौटुंबिक वादातून आपल्या तीन लहान मुलींसह घर सोडल्याची तक्रार पाली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

पाली पोलीस स्थानकातून मिळालेल्या माहितीनुसार कविता रघुनाथ भोय (वय २७) यांचे पती रघुनाथ प्रकाश भोय (वय ३७) यांच्याशी कौटुंबिक वाद झाला होता. या वादातून रागाच्या भरात आपल्या तीन लहान मुली (वय ६ वर्ष, ४ वर्ष व दिड वर्ष) यांना सोबत घेऊन कविता २५ मार्च रोजी संध्याकाळी कोणालाच न सांगता घर सोडून कुठेतरी निघून गेल्या आहेत, अशी तक्रार पती रघुनाथ प्रकाश भोय यांनी पाली पोलीस ठाण्यात दिली आहे.

कविता या रंगाने सावळ्या, उंची सुमारे ५ फूट, कपाळावर मध्यभागी गोंदवलेले, हातात गोफ, अंगात काळी साडी, पायात साधी चप्पल असे वर्णन असून सोबत तीन लहान मुली आहेत. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस निरीक्षक विश्वजित काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलदार जी. व्ही. डोंगरे करीत आहेत.

# रुग्णसाहित्य सेवा केंद्र ग्रामस्थांना आधार ठरेल

## ■ हभप रामदास महाराज पाटील यांचे वावोशी येथे प्रतिपादन

**खालापूर : प्रतिनिधी**



रुग्णाला जेव्हा कमोड चेअर, व्हीलचेअर, वॉकर, हॉस्पिटल बेड इत्यादी साहित्याची गरज लागते, त्यावेळी हे साहित्य सहज उपलब्ध होत नाही किंवा घ्यायला परवडत नाही. त्या वेळेला रुग्णाच्या नातेवाईकांची धावपळ होते. अशा परिस्थितीत राष्ट्रीय स्वयंयेवक संघ जनकल्याण समितीच्या वतीने सुरू करण्यात आलेले रुग्णसाहित्य सेवा केंद्र हे वावोशी छत्तीशी परिसरातील ग्रामस्थांना निश्चितच आधार बनेल, असे प्रतिपादन हभप रामदास महाराज पाटील यांनी वावोशी फाटा येथे बोलताना काढले.

जनकल्याण समितीच्या वतीने वावोशी फाटा येथील जनार्दन हाडप यांच्या कृषी सेवा केंद्रामध्ये सुरू करण्यात आलेल्या रुग्णसाहित्य सेवाकेंद्राच्या उद्घाटन प्रसंगी रामदास महाराज बोलत होते. या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका कार्यवाह अविनाश मोरे, ज्येष्ठ संघ कार्यकर्ते जयंत टिळक, जनकल्याण समितीचे जिल्हा कार्यवाह नितीन भावे, प्रकल्प प्रमुख जनार्दन हाडप व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला नितीन भावे यांनी जनकल्याण समितीचे यंदाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष असून समितीच्या वतीने १,६०० हून अधिक सेवाकार्य सुरू असल्याचे आपल्या प्रास्ताविकात सांगितले. मामा टिळक यांनी रुग्णसाहित्य केंद्रामुळे परिसरातील जनतेची मोठी सोय होणार असल्याचे सांगितले. शेवटी जनार्दन हाडप यांनी आभार मानले. भगवान शेटे गुरुजी, दाबके यांच्यासह ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# पेणमध्ये महिलांनी उभारली अस्मितेची गुढी

## स्त्री अत्याचारविरोधी मंच व अंकुर ट्रस्टचा उपक्रम

**पेण : प्रतिनिधी**




सातत्याने ११ वर्षांपासून सर्व जात, धर्म आणि आर्थिक स्तरातून एकत्र आलेल्या महिलांचा गुढीपाडवा म्हणजे पेणच्या पुरोगामी चळवळीचे एक महत्त्वाचे पाऊल आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी केले. त्या महिला अत्याचारविरोधी मंच व अंकुर ट्रस्ट यांच्यामार्फत आयोजित करण्यात आलेल्या समतेची गुढी कार्यक्रमात बोलत होत्या.

या वेळी स्वाती मोहिते, निता कदम, कविता पाटील, कैसर मुजावर, वैशाली कांबळे, संयोगिता टेमघरे, दीपश्री पोटफोडे आदि उपस्थित होत्या. पेण शहरात एकल महिला, मतिमंद, निराश्रित व आदिवासी महिला समवेत महिला मंचच्या सदस्यांनी वाजतगाजत मिरवणूक काढली. त्याची सांगता हिंदू, मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन आदिवासी व एकल महिलांनी एकत्रितपणे महात्मा गांधी वाचनालयातील प्रांगणात गुढी उभारून केली. ही मिरवणूक पेण शहरातील चौकात थांबत महिलांनी फुगड्या खेळत आनंद साजरा केला.

या वेळी आई डे केअर, चाईल्ड हेवन, अंकुर ट्रस्ट, मराठा महासंघ आणि संस्थांनी सहभाग घेतला. प्रकाश पाटील यांनी कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले. निता कदम यांनी सर्वांचे स्वागत केले व स्वाती मोहिते यांनी आभार मानले.

# जामीन प्रक्रियेत बोगस रेशनकार्डचा वापर

## पेणमध्ये गुन्हा दाखल


**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील एका गुन्ह्यातील आरोपीच्या जामीन प्रक्रियेत बोगस रेशनकार्डचा वापर केल्याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी रा. वरवठणे पो.नागोठणे ता.रोहा हे दिवाणी व फौजदारी न्यायालय पेण येथे सहाय्यक अधिक्षक या पदावर कार्यरत असून त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी रा. सेंटोंज हाईट्स, अलथान सुरत, रा. गुजरात याच्या जामीन प्रक्रियेत दोन आरोपींनी त्यांच्या नावाचे बोगस रेशनिंग कार्ड खरे असल्याचे भासवून ते जामीन प्रक्रियेमध्ये सादर केले. याबाबत पेण पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ढेबे हे करीत आहेत.

# नॅशनल फिशरीज डेव्हलपमेंट बोर्ड सदस्यपदी आमदार रमेश पाटील

**मुरूड : प्रतिनिधी**



कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व भाजपचे आमदार रमेश पाटील यांची नॅशनल फिशरीज डेव्हलपमेंट बोर्डाच्या सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून आमदार रमेश पाटील कोळी महासंघाच्या माध्यमातून मच्छिमार बांधवांचे विविध प्रश्न सभागृहात मांडून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे त्यांची निवड म्हणजे खऱ्या अर्थाने मच्छिमार बांधवांचा सन्मान असून कोळी बांधव आनंदित झाले आहेत.

या निवडीनंतर आमदार रमेश पाटील यांनी सांगितले की, कोळी महासंघ नेहमीच कोकण किनारपट्टीवरील मच्छिमार बांधवांच्या उन्नतीकरीता प्रयत्नशील असून पुढील काळातही नॅशनल फिशरीज डेव्हलपमेंट बोर्डाच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ संपूर्ण देशभरातील मच्छिमार बांधवांना मिळवून दिला जाईल. तसेच मच्छिमार बांधवांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

याबाबत रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले की, रमेश पाटील यांना मच्छिमार बांधवांचे प्रश्न चांगले अवगत असून ते सोडवण्यासाठी ते नेहमीच चांगला प्रयत्न करीत असतात. त्यांच्या या निवडीचे संपूर्ण रायगड जिल्ह्यातून मच्छिमारांच्या वतीने मी स्वागत करीत आहे.

# तळपत्या उन्हात पक्षी-प्राण्यांना आधार

## पर्यावरणस्नेही व प्राणीमित्र मारुती राणेंची अनोखी भूतदया | सात वर्षांपासून करतायेत अन्न-पाण्याची मोफत सोय

**पाली : प्रतिनिधी**

सध्या उन्हाच्या काहिलीने पक्षी-प्राण्यांचेही अन्न व पाण्यावाचून हाल होत आहेत. या पशुपक्षांच्या अन्न व पाण्याची व्यवस्था करण्यासाठी अनेक प्राणीपक्षी मित्रांनी पुढाकार घेतला आहे. त्यातीलच एक म्हणजे वरवठणे गावचे मारुती राणे. तब्बल सात वर्षांपासून ते प्राणी व पक्षांच्या अन्न, पाण्याची नियमित व्यवस्था करीत आहेत. त्यांच्या या निःस्वार्थी व सेवाभावी कार्याचे सर्वत्र कौतुक होतेय.

माळरान, किल्ले या सर्व ठिकाणी पावसाळयात मोठ्या प्रमाणात छोटी झुडुपे व गवत उगवते, परंतु ऑक्टोबरनंतर वाढत्या उष्म्याने ही झुडुपे व गवत सुकते आणि यामुळेच पशु-पक्ष्यांच्या अन्न व पाण्याचा प्रश्न उपस्थित होतो. उन्हाळ्याच्या दिवसांत लागणारे वणवे हिरवीगार वनसंपदा नष्ट करीत आहेत. गवत जळल्याने गवतावर अवलंबून असणाऱ्या गुरे-ढोरांवर उपासमारीची वेळ येते. अशा वेळी मारुती राणे या प्राण्यांसाठी देवदूत ठरत आहेत. मारुती राणे म्हणाले की, २०१५पासून प्राण्यांसाठी हे सेवाकार्य सुरू आहे. पूर्वी ५ लिटर पाणी आणायचो आता २० लिटर पाणी आणावे लागते. पक्षी प्राणी यांना फळे, धान्य नित्यनियमाने घेऊन येतो. वानर, माकडे, कुत्री माझ्या येण्याच्या आतुरतेने वाट बघत असतात, मी आलो, आवाज दिला की, सारे वन्यजीव जवळ येतात. प्राण्यांचा मिळत असलेला सहवास व त्यांची तहान व भूक भागते याचे परमोच्च समाधान मिळते. आता या सर्वांना माझी सवय झाली, मलाही त्यांची सवय झाली. पूर्वी प्रतिकूल परिस्थिती होती, आज या मुक्या जीवांची सेवा करता येतेय, मन भरून येतेय, असे राणे म्हणाले.


वाढत्या उष्म्यामुळे जंगल, माळरानावरील पाणवठे आटत आहेत. तसेच वणवे आणि कडक उष्मा यामुळे वृक्षराजी नष्ट होत आहे. त्यामुळे पशुपक्षांची अन्न, पाण्याच्या शोधत वणवण होत आहे. त्यामुळेच अनेकांनी आपल्या परसबागेत तर काहींनी जंगलात, रस्त्याच्या दुतर्फा पक्षी व प्राण्यांसाठी पाण्याची व खाद्याची व्यवस्था केली आहे. झाडांना प्लास्टिकच्या बाटल्या किंवा कॅन कापून अडकविले आहेत. त्यात पाणी आणि गहू, नाचणी, वरी असे खाद्य ठेवले जाते. तसेच जंगलात प्लास्टिकचे ड्रम कापून त्यामध्ये पाणी ठेवले जाते. नागोठणे-रोहा मार्गावर भिसेखिंडीतदेखील ठिकठिकाणी रस्त्याच्या कडेला झाडाला व संरक्षण कठड्यावर कापलेले प्लास्टिकचे ड्रम ठेऊन त्यात पाणी व दाणे ठेवले जात आहेत, असे राणे यांनी सांगितले.





(छाया : धम्मशील सावंत)

> **विणीच्या हंगामात पक्षी घरटी बांधण्यासाठी मनुष्य वस्तीचा शोध घेत असतात. अशा पक्षांना हक्काचं आणि सुरक्षित घर मिळावं म्हणून ही सर्व धडपड चालू आहे. तयार झालेले पर्यावरणस्नेही घरटी पाहून अनेक निसर्गप्रेमी लोकसुद्धा ती बनविण्यासाठी पुढाकार घेत आहेत.**
>
> **-राम मुंढे, पक्षी अभ्यासक, विळे**



## वांगणीमध्ये पक्ष्यांच्या निवाऱ्याची व्यवस्था

**वांगणी गावात संकल्प मित्रमंडळ व उत्कर्ष मित्रमंडळ ही दोन मंडळे व तेथील तरुण मागील काही वर्षांपासून उन्हाळ्यात पशुपक्षांसाठी पाण्याची व्यवस्था करतात. येथील भिसेखिंड येथे उन्हाळ्यात पशुपक्ष्यांसाठी ठिकठिकाणी रोज २४ तास पिण्याचे पाणी ठेवले जाते, असे येथील प्रयोगशील शिक्षक टिळक खाडे यांनी सांगितले. जांभूळपाडा येथील पशुपक्षी प्रेमी सचिन मजेठिया हे गेली अनेक वर्षे मोकाट जनावरे व पक्षांसाठी अन्नपाण्याची व्यवस्था करत आहेत. त्यासाठी दुकानाबाहेर छोटा हौद बनवून घेतला आहे. पक्षांसाठी थंडगार पाणी मिळावे म्हणून अनेक जण चक्क मातीची भांडी बनवून घेऊन ते परसात व झाडांवर लावतात. पालीतील डॉ. राऊत, पुई-सिद्धेश्वर येथील तरुण गणेश शिंदे व फणसवाडी येथील तरुण निलेश शिंगरे हे मागील वर्षीपासून हा अनोखा उपक्रम राबवित आहेत. तसेच ग्रीन टच नर्सरीचे चालक अमित निंबाळकर यांनी देखील आपल्या नर्सरीमध्ये व घराजवळ झाडांवर पक्षांसाठी घरटी बनवली आहेत.**

# दुचाकींसाठी नवीन मालिकेतील नोंदणी क्रमांक

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण येथे दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरू करण्यात येत आहे. यासाठी ज्यांना खासगी चारचाकी वाहनांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क (तीनपट शुल्क) भरून हवे असतील त्यांनी मंगळवारी (दि. ५) कार्यालयीन वेळेत विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या खासगी वाहन विभागात डीडी, पत्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा.

एकाच नंबरकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी बुधवारी (दि. ६) कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. त्यानुसार एकाच नंबरसाठी एकापेक्षा जास्त अर्ज असतील तर त्या अर्जदारांनी जास्तीच्या रक्कमेचा डीडी बंद लिफाफ्यामध्ये कार्यालयात जमा करावा, अतिरिक्त डीडी कमीत कमी ३०१ रु. चा असावा. या अर्जासाठी त्याच दिवशी दुपारी ४ वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नवीन वाहन नोंदणी विभाग यांच्या दालनात लिलाव करण्यात येणार आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस याद्वारे अस सूचित व सावधान करणेत येते की, माझे अशिल श्रीमती रिटा परेश देडिया यांनी मौजे कामोठे, ता. पनवेल सेक्टर-१२ मधील भूखंड क्र.३७ क्षेत्र १३७५ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड (जो मौजे पनवेल, ता. पनवेल येथील सर्वे नं.६२८/१०, २९/७, ६००/३, ६३३/१, ७९४/४, ७९४/१२, १३/३, १३/१०, १३/११, १४/१, १६/२ आणि ३५१/२अ या मिळकतींच्या संपादनापोटी वितरीत करणेत आला आहे) श्री. एकनाथ शनिवार गोवारी, वगैरे ७ यांचेकडून कायम खरेदी करणेचे ठरविले असून, तसा साठेकरार दिनांक १६.१०.२००६ रोजी करणेत आला आहे आणि त्या करारानुसार विक्रेते यांना अंशतः रक्कमही अदा केली आहे. परंतु सदर श्री. एकनाथ शनिवार गोवारी, वगैरे यांनी त्या साठेकरारानुसार खरेदीखत व/वा आवश्यक ते हस्तांतरण दस्त निष्पादित व नोंदणी करून न देता, कराराप्रमाणे आवश्यक ती पूर्तता करणेस टाळाटाळ केली आहे. सबब माझे अशिलांनी श्री. एकनाथ शनिवार गोवारी, वगैरे यांचेविरूद्ध त्या साठेकराराची विशेष पूर्तता करून मिळणेसाठी विशेष दिवाणी दावा नं.१४/२०१६ चा दावा दाखल केलेला आहे. त्या दाव्याचे कामी माझे अशिलांनी सिडको प्राधिकरणासदेखील प्रतिवादी म्हणून पक्षकार केलेले आहे. वर नमूद दावा प्रलंबित असताना, सदर श्री. एकनाथ शनिवार गोवारी, वगैरे यांनी मे. जय बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, भागीदारी संस्था यांचे लाभात बेकायदेशीरपणे व अनाधिकाराने विकसन करार आणि त्रिपक्षीय करार करून तिऱ्हाईत पक्षकारांचा हक्क निर्माण केला आहे. त्यामुळे सदर भागीदारी संस्था व तिचे भागीदार यांनादेखील वर नमूद दाव्याचे कामी प्रतिवादी म्हणून सामील केले आहे. सदर मे. जय बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, भागीदारी संस्था यांचे लाभातील तथाकथित हस्तांतरण व्यवहारास मिळकत हस्तांतरण अधिनियम, १८८१ चे कलम ५२ च्या तरतुदीन्वये लिस पेन्डंन्स या न्यायतत्वाची सक्त बाधा आहे. सदरचा दावा प्रलंबित असतानाही, मे. जय बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, भागीदारी संस्था यांनी मिळकतीचे ठिकाणी त्यांचे नियोजित बांधकामातील निवासी सदनिका व/वा दुकान गाळे खरेदी घेणेबाबत जाहीरात करून तमाम जनतेस, मुख्यत्वेकरून इच्छुक खरेदीदारांस आवाहन केले आहे. मुळात मे. जय बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, भागीदारी संस्था यांना वर नमूद दावा प्रलंबित असताना वर नमूद भूखंडामध्ये नियोजित बांधकाम करणेचा व त्या बांधण्यात येणाऱ्या इमारतींतील निवासी सदनिका व/वा दुकान गाळे विक्री करणेचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे तशा कोणत्याही हस्तांतरणास व/वा व्यवहारास माझे अशिलांची सक्त हरकत आहे.

सबब माझे अशिलांद्वारे तमाम जनतेस असे सुचित व सावधान करणेत येते की, वर नमूद भूखंडामध्ये मे. जय बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, भागीदारी संस्था बांधणार असलेल्या नियोजित इमारतींतील निवासी सदनिका व/वा दुकान गाळे या संदर्भात मे. जय बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, भागीदारी संस्था यांचेबरोबर कोणीही, कोणत्याहीप्रकारे, कसलाही व्यवहार करू नये. याउपरही कोणीही कोणत्याहीप्रकारे तसे काही व्यवहार केल्यास, ते माझे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत आणि ते दिवाणी अगर फौजदारी कायदेशीर कारवाईस पात्र असतील. तसेच संबंधित व्यक्ती माझे अशिलांना होणाऱ्या नुकसानीसही जबाबदार असतील व राहतील, याची कृपया स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
तारीख : - ०४.०४.२०२२.

सही/-
(अॅड.सुरेंद्र नारायण जोशी)
अे-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा, बीचरोड, अलिबाग को.ऑप. अर्बन बँक समोर, अलिबाग, जिल्हा रायगड.

# ‘विशेष’ कोविड लसीकरण

## नवी मुंबईत आज दिव्यांगांकरिता सत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

दिव्यांग मुले व व्यक्ती यांच्याकडे विशेष लक्ष देत महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांगांकरीता सोमवारी (दि. ४) सकाळी ९ ते दुपारी २ वेळेत सार्वजनिक रुग्णालय वाशी, नेरुळ व ऐरोली याठिकाणी विशेष लसीकरण सत्राचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या लसीकरण सत्रात १२ ते १४ वयोगटातील दिव्यांग मुलांना कोर्बेवॅक्स लसीची पहिली मात्रा दिली जाणार आहे. तसेच १५ ते १८ वयोगटातील दिव्यांग मुलांकरिता कोवॅक्सिन लसीची पहिली व दुसरी मात्रा उपलब्ध असणार आहे. त्याचप्रमाणे १८ ते ५९ वयोगटातील दिव्यांग



नागरिकांकरिता कोवॅक्सिन व कोविशिल्ड लसीची पहिली व दुसरी मात्रा उपलब्ध आहे आणि ६० वर्षांवरील दिव्यांग ज्येष्ठ नागरिकांकरिता कोवॅक्सिन व कोविशिल्ड या दोन्ही लसीची पहिली व दुसरी मात्रा तसेच प्रिकॉशन डोसदेखील उपलब्ध असणार आहे.

पालिकेच्या वतीने सुरुवातीपासूनच कोविड लसीकरण करण्याकडे विशेष लक्ष देण्यात आल्याने प्रभावी रितीने कोव्हीड नियंत्रण करणे शक्य झाले. १८ वर्षांवरील नागरिकांच्या लसीकरणाचे दोन्ही डोस १०० टक्के पूर्ण करणारी नवी मुंबई ही राज्यातील पहिली महानगरपालिका ठरली. १५ ते १८ वयोगटातील लसीकरणातही पहिल्या डोसचे १०० टक्के लसीकरण नवी मुंबई महानगरपालिकेनेच पूर्ण केले.

लसीकरण करताना विशेष घटकांकडे प्राधान्याने लक्ष देण्याचे धोरण नवी मुंबई महानगरपालिकेने जपले. त्यामुळे दिव्यांग व्यक्तींप्रमाणेच ज्या व्यक्तींचा सेवा कार्य करताना अधिकाधिक व्यक्तींशी संबंध येतो अशा कोरोना प्रसाराच्या दृष्टीने जोखमीच्या व्यक्तींच्या लसीकरणाकडेही विशेष लक्ष देण्यात आले.

**नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग मुले व व्यक्तींनी या विशेष लसीकरण सत्राचा लाभ घेऊन ४ एप्रिल रोजी आपल्या वयानुसार योग्य लस घ्यावी तसेच दुसरा डोस अथवा प्रिकॉशन डोस घेताना पहिला डोस ज्या लसीचा घेतलेला आहे त्याच लसीचा दुसरा डोस व प्रिकॉशन डोस घ्यावा.**
**-अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

कोविड लसीकरणाचा दुसरा डोस घेणे बाकी असलेल्या नागरिकांनी दुसरा डोस घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे नुकत्याच सुरू झालेल्या १२ ते १४ वयोगटातील मुलांच्या जलद लसीकरणावरही भर देण्यात येत आहे.

एसटी संपकऱ्यांचा लढा सुरूच

# पनवेल आगारातील निलंबित ४२ पैकी फक्त दोन कर्मचारी हजर

**पनवेल : प्रतिनिधी**

विलीनीकरणासाठी सुरू असलेला एसटी कर्माचाऱ्यांचा लढा सुरूच असल्याने परिवहन मंत्री अनिल परब यांनी इशारा देऊन ही निलंबित करण्यात आलेल्या पनवेल आगारातील ४२ पैकी फक्त दोन कर्मचारी कामावर हजर झाले आहेत. त्यामुळे पनवेल आगारातून फक्त सात शेड्यूल सुरू आहेत. संपकरी कर्मचारी आता ५ एप्रिलला न्यायालय आपल्याला न्याय मिळेल या विश्वासावर बसला आहे.

एसटी कर्मचाऱ्यांचे विलिनीकरण करावे या मागणीसाठी राज्यात आंदोलन सुरू आहे. या संपामुळे पनवेल आगाराचे कामकाज ठप्प झाले आहे. या आंदोलनाचा फटका प्रवाशांना बसला आहे. पनवेल शहर हे दळणवळणाच्या दृष्टीने मध्यवर्ती ठिकाण आहे. मुंबई, ठाणे, कल्याण, घाटमाथा व कोकणात पनवेल बस आगारातून गाड्या सुटत असल्याने प्रवाशांची मोठी वर्दळ याठिकाणी असते. आगारातील वाहक, चालक आणि कार्यशाळेतील कर्मचाऱ्यांनी मागण्या जोपर्यंत मंजूर केल्या जात नाहीत, तोपर्यंत हा संप सुरु राहणार असल्याची भूमिका घेतल्याने आगारातील ३०५ कर्मचार्यापैकी ४२ कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. यामध्ये चालक वाहक, कार्यशाळा कर्मचारी, वाहतूक नियमत्रक व चालक-वाहक (चावा) यांचा समावेश आहे



परिवहन मंत्री अनिल परब यांनी एसटी कर्मचाऱ्यांचे शासनात विलिनीकरण करण्याऐवजी त्यांना वेतन वाढ देण्याची तयारी दाखवून ३१ मार्चपर्यंत कर्मचाऱ्यांना हजर होण्याचे आवाहन केले होते. हजर झाल्यास केलेली कारवाई रद्द करण्याचे ही आश्वासन दिले होते. त्याला प्रतिसाद देऊन पनवेल आगारातील ४२ पैकी फक्त दोन कर्मचारी हजर झाले आहेत. सध्या पनवेल आगारात १४ चालक आणि १३ वाहक हजर झाल्याने त्यांच्याकडून ४० शेड्यूल पैकी ७ शेड्यूल चालवण्यात येत आहेत. पनवेल, पेण, दोन महाड आणि एक लांब पल्ल्याची अहमदनगर गाडी ३१ मार्च पासून सोडण्यात आल्याची माहिती आगार व्यवस्थापक विलास गावडे यांनी दिली.

# आजपासून मिशन इंद्रधनुष ४.०ची दुसरी फेरी

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात मार्च २०२२ ते मे २०२२ या कालावधीत विशेष मिशन इंद्रधनुष ४.०च्या तीन मोहिमांचे नियोजन करण्यात आले आहे. यातील प्रथम फेरी ७ मार्च ते १३ मार्च २०२२ मध्ये राबविण्यात आली. या मिशनची दुसरी फेरी ४ एप्रिल २०२२ पासून राबविण्यात येत आहे.

बालकांमधील मृत्यू व आजाराचे प्रमाण कमी करण्यासाठी लसीकरण हे अतिशय प्रभावी साधन आहे, मात्र अर्धवट लसीकरण झालेली तसेच लसीकरण न झालेली बालके ही पूर्ण लसीकरण झालेल्या बालकांपेक्षा लवकर आजारी पडतात किंवा मृत्यू पावतात असे नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणात असे आढळून आले आहे. या मोहिमेमध्ये लसीकरणापासून पूर्णपणे वंचित राहिलेल्या किंवा अर्धवट लसीकरण झालेल्या बालकांचा शोध घेऊन त्यांचे लसीकरण पूर्ण करण्यात येणार आहे.

या मोहीमेची पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने लसीकरण टास्क फोर्सची विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये इंडियन मेडीकल असोसिएशन, इंडियन असोसिएशन ऑफ पिडियाट्रीक, एकात्मिक बालविकास विभाग यांचे प्रतिनिधी, सर्व रुग्णालयांचे प्रमुख तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. या सभेमध्ये अपेक्षित लाभार्थ्यांच्या



(प्रातिनिधीक छायाचित्र)

यादीपैकी प्रत्येक लाभार्थ्यावर लक्ष केंद्रीत करून १०० टक्के उद्दिष्टपूर्ती करणेकरीता प्रत्येक वैद्यकीय अधिकारी यांनी विशेष प्रयत्न करावेत, असे सूचित करण्यात आले.

यापूर्वीच या मोहीमेची पहिली फेरी ७ मार्च ते १३ मार्च २०२२ या कालावधीत यशस्वीपणे राबविण्यात आली. यामध्ये ६५ सत्रांव्दारे ३७८ गरोदर माता व १५६९ बालकांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. या मोहिमेमध्ये एकूण ३८७ गरोदर मातांना व १५२९ बालकांना लसीकरण करण्यात आले. या मोहिमेला नागरीकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

शासन निर्देशानुसार या मोहिमेची पुढची दूसरी फेरी ४ ते ११ एप्रिल २०२२ या कालावधीत राबविण्यात येत असून यासाठी ६४ बाहयसत्रे व पाच मोबाइल अशा एकूण ६९ सत्रांचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये ३७१ गरोदर माता व १३२५ बालकांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे व लसीकरणाबाबत संबंधीत सर्व कर्मचाऱ्यांचे पुन्हा प्रशिक्षण घेण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात नियमित लसीकरणांतर्गत बीसीजी, बी ओपीव्ही, हिपॅटायटीस बी, पेंटाव्हॅलंट, एफ आयपीव्ही, रोटा, गोवर रुबेला, टीडी, डीपीटी, पीसीव्ही या लसी मोफत देण्यात येत असून प्रत्येक इंजेक्शनकरिता नवीन सिरींज व नीडल वापरण्यात येते. तरी सर्व नागरिकांनी विशेष मिशन इंद्रधनुष ४.० अंतर्गत आपल्या पाच वर्षांपर्यंतच्या मुलांना लसीकरण करुन संरक्षित करावे, असे नवी मुंबई मनपा आयुक्त अभिजित बांगर यांनी सांगितले.

# मोहोपाड्यात गांजा जप्त; आरोपी अटकेत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा गावाच्या हद्दीत बंद एचओसी कॉलनीमध्ये शुक्रवारी (दि. १) रात्री आठच्या सुमारास रसायनी पोलिसांनी कारवाई करुन आरोपीच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून साडेचार किलो गांजा जप्त केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रसायनी पोलिसांना गुप्त बातमीदाराकडून एचओसी कॉलनीच्या परिसरात इसम गांजा घेऊन आल्याची माहिती मिळाली होती. या वेळी रसायनी पोलिसांनी आरोपी इम्तियाज निकाज अहमद कुरेशी (वय ३४, सध्या रा. आळी आंबिवली) याला पकडले असता त्याच्या बॅगमध्ये चार किलो ५०० ग्रॅम इतक्या वजनाचा मानवी शरीरावर परिणाम करणारा पदार्थ गांजा हा अंमली पदार्थ १,१२,५०० रुपये किमतीचा मुद्देमाल विक्रीच्या उद्देशाने बाळगल्याच्या स्थितीत मिळून आला.




मोहोपाडा येथील बंद एचओसी कॉलनीमध्ये गांजा विकणाऱ्यास रसायनी पोलिसांनी मालासह ताब्यात घेतले. आरोपीविरुद्ध रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला शनिवारी (दि. २) खालापूर न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पुढील तीन दिवस पोलीस कस्टडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. याबाबत पुढील अधिक तपास रसायनी पोलिस करीत आहेत.

## निवडक

### श्री खंडोबा मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा

**पनवेल :** नेरेपाडा येथे नवीन मंदिरात श्री खंडोबा मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा ५ आणि ६ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे. या वेळी भजन, कीर्तन, होम विधी, पालखी सोहळा, भजन, महिला भजन, संगीत भजन आयोजित करण्यात आले आहे. ६ एप्रिल रोजी खंडोबा मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. या सोहळ्याला नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन गोटीराम माया म्हात्रे यांनी केले आहे.

### नवीन पनवेलमध्ये वधू-वर मेळावा

**उरण :** दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी महाराष्ट्र वीरशैव सभा रायगड जिल्ह्याच्या वतीने वीरशैव लिंगायत समाजातील इच्छुक वधुवरांसाठी रविवारी (दि. १०) नवीन पनवेलमधील कर्नाटक संघ हॉल येथे वधुवर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.वीरशैव लिंगायत समाजातील सर्व जाती पोटजातीतील तसेच जंगम समाजातील बंधु भगिनींणी आपल्या उपवर मुला/मुलींसोबत हजर रहावे. कार्यक्रमाची नोंदणी ११ ते १ या वेळेत मेळाव्याच्या ठिकाणीच होईल. लगेचच दुपारी २ वाजता मेळावा सुरू होईल. यासाठी कोणतेही प्रवेश फी नाही. अधिक माहितीसाठी अध्यक्ष महेंद्र बोडके (९८२२३४६८५२), सेक्रेटरी नितीन वाणी (९३२५२५५६११), मंगला बिराजदार (९९२०१५६१४४), रेखा कोरे (९९२३३८६६४२) यांच्याशी संपर्क साधावे, असे आवाहन अध्यक्ष बोडके यांनी केले आहे.

# होपमिरर फाउंडेशनकडून आदिवासी समाजासाठी विकास प्रकल्प सुरू



**खारघर : रामप्रहर वृत्त**

होपमिरर फाउंडेशनच्या वतीन आदिवासी समाजाच्या विकासाठी आणि सुधारण्यासाठी आदिवासी विकास प्रकल्प सुरू करण्याचा सामाजिक प्रयत्न सुरु केला. होपमिररच्या टीम ने खारघर शहराजवळ असलेल्या दोन आदिवासी वाडीचे सर्वेक्षण केले.

घोलवाडी, आंबवडी तोंडी सर्वेक्षण करण्यात आले. ज्यामध्ये व्यवसाय पद्धती, मुलांची शैक्षणिक स्थिती, उत्पन्नाचे स्रोत आणि पायाभूत सुविधा पाहिल्या. होपमिररची टीम या आदिवासी गावांची काळजी घेत असल्याने या आदिवासी गावाला आधुनिक गावात बदलण्यासाठी होपमिरर फाउंडेशन आता तेथील विकासावर काम करत आहे. यासाठी नवीन वर्षाच्या सुरुवातीला जानेवारीपासून प्रोजेक्ट शिक्षा-बाल विकास कौशल्य उपक्रम राबविण्यात येत आहे.

खेड्यापाड्यातील गरजूंना शिक्षण देण्यासाठी होपमिररच्या टीमने आदिवासी भागातील ओसाड भागाचे रूपांतर शिकवण्याच्या सुविधेत केले आहे. या प्रकल्प करिता अंजुमन-इस्लाम-टेक्निकल-कॅम्पस, नवीन पनवेल कॉलेजचे स्वयंसेवक त्यांना आवश्यक विषय शिकवतात आणि शिक्षणासंबंधी दैनंदिन क्रियाकलाप करतात. होपमिररच्या या उपक्रमांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद आणि प्रतिक्रिया मिळत असल्याने हे उपक्रम पुढेही ठेवण्यासाठी, आम्ही शक्य तितक्या सर्व प्रकारे आपल्या सहकार्याची अपेक्षा करतो. होपमिरर फाउंडेशनने संपूर्ण समाजाला शिक्षित करण्याच्या दिशेने एक पाऊल यशस्वीपणे टाकले आहे, असे होपमिरर फाऊंडेशन संस्थेचे अध्यक्ष रमझान शेख यांनी सांगितले.

# रसायनीत गावठी कट्टा, काडतुसे बाळगल्याप्रकरणी एकाला अटक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीत बेकायदेशीर सिंगल बोअर असलेला गावठी बनावटी कट्टा व दोन जिवंत काडतुसे विनापरवाना बाळगल्याप्रकरणी वडगाव येथील राजेंद्र मारुती जाधव (वय ४३) यांना अटक करण्यात आली आहे.

रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वडगाव येथील राजेंद्र मारुती जाधव यांच्याकडे वाशिवली येथील आपल्या दुकानाच्या गाळ्यात १५ हजार किमतीची सिंगल बोअर असलेल्या गावठी बनावटीचा कट्टा त्याची नळी काळ्या रंगाची व बॉडी पिवळसर धातूची तर ट्रिगर (चाप) व बाजूस घोडा असून तो चालू स्थितीत पोलिसांना कारवाईत मिळून आला. या गावठी कट्ट्याचे बट, ट्रिगर व हॅमरवर लाल रंगाचा धागा गुंडाळलेला आहे तसेच ३००० हजार रुपये किमतीची पिवळसर धातुची दोन काडतुसे सापडली.

याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल झाला असून त्याला शनिवारी (दि. २) न्यायालयात हजर केले असता दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. याबाबत अधिक तपास सुरू आहे.



# विभागीय टेबल टेनिस चॅम्पियनशिप स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रह वृत्त**

मिस्तु केम प्लास्ट लि., खोपोली व्यवस्थापकीय संचालक संजय मावजी डेढिया, नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन व सामाजिक विकास मंडळ यांच्या सहकार्याने नवीन पनवेल येथे २६ व २७ मार्च या कालावधीत विभागीय टेबल टेनिस चॅम्पियनशिप स्पर्धा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडल्या.



या स्पर्धेचे उद्घाटन सिडको एईई संतोष साळी यांच्या हस्ते करण्यात आले, तर मिस्तु केम प्लास्ट लि. चे व्यवस्थापकीय संचालक संजय मावजी डेढिया यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. स्पर्धेचे मुख्य पंच डी. आर. साळसकर, सहाय्यक मुख्य पंच पराग अंकोलेकर उपस्थित होते.

स्पर्धेत मुलींमध्ये स्वरा खराडे सुवर्णपदक, समिक्षा वाघ रौप्यपदक, कांस्यपदक दिया बाउवा आणि तनिष्का चौधरी तर मुलांमध्ये अद्वित गुप्ता सुवर्णपदक, संस्कार पाटील रौप्यपदक, मयंक जैन, दीप मालपे, सुष्मित भिडे, प्रियांश जैन, आदित्य जोग यांनी कांस्यपदक पटकावले.

११ वर्षांखालील मुलींच्या गटात प्रथम अनन्या मराठे तर द्वितीय तन्वी कदम, मुलांमध्ये प्रथम प्रणिल आजगावकर व द्वितीय अद्वित गुप्ता यांनी पटकावला.१३ वर्षांखालील मुलींच्या गटात निहाली पाटील प्रथम, वेदिका भगत द्वितीय, मुलांमध्ये म्रीथय कळामकर प्रथम व हर्षद कुदाळे द्वितीय, १५ वर्षांखालील मुलींमध्ये अंनिशा पात्रा प्रथम, निहाली पाटील द्वितीय, मुलांमध्ये म्रीथय कळामकर प्रथम व शिवम गुप्ता याने द्वितीय, १७ वर्षांखालील मुलींमध्ये अंनिशा पात्रा प्रथम, कनिष्क प्रभू द्वितीय, मुलांमध्ये म्रीथय कळामकर प्रथम, रुषी चव्हाण द्वितीय, १९ वर्षांखालील मुलींमध्ये सुहानी कुराडे प्रथम, कनिष्क प्रभू द्वितीय, मुलांमध्ये अभिजित जोशी प्रथम, तनिष्क गोरे द्वितीय, वयोवृद्ध पुरुषांमध्ये अतुल देशमुख प्रथम, अभिनवकुमार मिश्रा द्वितीय, महिला खुला प्रवर्गात आनंदिता बसाक प्रथम, सुहानी कुराडे द्वितीय, मिश्र दुहेरी खुल्या प्रवर्गात पृथवेश मांडले आणि रुषभ साळसकर प्रथम, आनंदिता बसाक आणि सुहानी कुराडे द्वितीय, पुरुष खुल्या प्रवर्गात राजू यादव प्रथम तर रजत तोरस्कर यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.

# पोलिसांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील शेडुंग फाटा येथे असलेल्या सेंट विल्फ्रेड कॉलेज ऑफ लॉ येथील विद्यार्थ्यांना पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी पोलीस ठाण्यातील चालणाऱ्या कामकाजासंदर्भात मार्गदर्शन केले.




पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील सेंट विल्फ्रेड कॉलेज ऑफ लॉ शेंडूग या कॉलेजमधील विद्यार्थी ९० व विद्यार्थिनी ८० असे एकूण १७० विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच त्यांना विविध विषयांबाबत योग्य त्या सूचना देण्यात आल्या. शाळा व कॉलेज यांच्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडीअडचणींबाबत, गुड टच-बॅड टचबाबत, अमली पदार्थ व व्यसनापासून दूर राहणे, महिलांच्या लैंगिक सुरक्षेच्या संदर्भात अडीअडचणींबाबत अशा विविध विषयांबाबत पोलिसांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यासोबतच सर्व विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्यातील दैनंदिन कामकाजाबाबत सुद्धा सविस्तर मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

या वेळी सेंट विल्फ्रेड कॉलेज ऑफ लॉ मधील प्राचार्य डॉ. मृत्युंजय पांडे, डॉ. रामदान यादव, आर. सी. राय, स्नेहा वायकर, जमुना शर्मा व विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# सागरगडावरील तोफेला शिवभक्तांनी चढविला साज

## भंडारा उधळत साजरा झाला सोहळा



**अलिबाग : प्रतिनिधी**

ऐतिहासिक ठेवा जतन करणे हे आपले आद्यकर्तव्य आहे. तरच पुढच्या पिढीला इतिहासाची ओळख होऊ शकते. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून अलिबागमधील सागरगड किल्ल्यावर असलेल्या तोफेसाठी मित्रो ग्रुप चिंचोटी, ग्रामस्थ मंडळ व शिवभक्त मावळे यांनी तोफगाडा घडवला आहे.

रविवारी (दि. ३) या तोफगाड्याचा लोकार्पण सोहळा किल्ले सागरगड येथे मोठ्या उत्साहात पार पडला. महाराजांना वंदन करून भंडारा उधळून लोकार्पण सोहळा झाला.

किल्ले सागरगड याला ऐतिहासिक वारसा आहे. किल्ल्यावरील ऐतिहासिक ठेवा जतन करण्यासाठी शिवभक्त हे नेहमी स्वच्छता मोहीम आखत असतात. किल्ल्यावर अडगळीत गेलेल्या तोफा शिवभक्तांनी बाहेर काढल्या आणि त्यांना पुनर्जीवित केल्या. किल्ल्यावर सध्या पाच तोफा असून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याशेजारी चार तोफा लावल्या आहेत, तर सर्वांत मोठ्या असलेल्या तोफेला गाडा तयार करण्यात आला आहे.



चिंचोटी ग्रामस्थ आणि शिवभक्त मावळ्यांनी भंडारा उधळून तोफ तोफगाड्यावर बसविली. या वेळी महाराजांची गारद देण्यात आली. यामुळे सागरगडावर शिवमय वातावरण तयार झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या घोषणेने सारा परिसर दुमदुमला होता.

# कर्जतमधील वाहतूक कोंडी सुटता सुटेना

## डेक्कन जिमखाना परिसर नो पार्किंग झोन जाहीर करण्याची मागणी



**कर्जत : बातमीदार**

कर्जत शहरातील वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण झाले आहेत. याचे मुख्य कारण अवैध पार्किंग आहे. रेल्वेस्टेशन परिसरातील डेक्कन जिमखाना परिसर दुचाकी पार्किंगचे स्टेशन बनले आहे. अनेक वेळा नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे हा परिसर नो पार्किंग झोन जाहीर करावा, अशी मागणी डेक्कन जिमखानामधील स्थानिक रहिवाशांनी केली आहे. कर्जत नगरपालिका प्रशासनाला याबाबत निवेदनही देण्यात आले आहे.

शहरातील डेक्कन जिमखाना परिसर हा रेल्वेमार्गाला लागून असल्याने रस्तालगत पहाटेपासूनच रहदारी असते. ग्रामीण भागातील कामगार वर्ग सकाळच्या वेळी घाईघाईत येऊन कुठेही दुचाकी पार्किंग करून लोकल पकडण्यासाठी जात असतात. अवैधरित्या पार्किंग केलेल्या वाहनांमुळे येथील हिंगमिरे वाडा तसेच सप्तपदी अपार्टमेंटचा येण्या-जाण्याचा मार्ग बंद होतो. एखादी आपत्कालीन परिस्थितीत त्यांना दवाखान्यात नेण्यास अडचण निर्माण झाल्यास याला जबाबदार कोण? असाही सवाल येथील नागरिक विचारत आहेत.

दररोज निर्माण होणारी समस्या लकसाहत घेऊन डेक्कन जिमखाना रहिवासी मंडळाने हा विभाग नो पार्किंग झोन म्हणून घोषित करावा आणि वाहनांना कायमस्वरूपी पार्किंगकरीता जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी कर्जत नगरपरिषदेला दिलेल्या निवेदनात केली आहे.

### अवैध पार्किंगवर कारवाई करा!

**जोपर्यंत जागा उपलब्ध होत नाही तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात पिंटो गॅस ते मुद्रे रस्त्याच्या पिवळ्या पट्ट्याबाहेर पार्किंगची व्यवस्था करावी. तसेच स्टेशन परिसरातील अधिकृतरित्या पार्किंग करणाऱ्या दुचाकी वाहनांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. डेक्कन जिमखाना रहिवासी मंडळाने आपल्या मागण्यांचे निवेदन कर्जतचे तहसीलदार आणि पोलीस ठाणे यांनादेखील सादर केले आहे.**

# गुढीपाडव्यानिमित्त रोह्यात रा. स्व. संघाचे संचलन



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरासह ग्रामीण भागात गेली दोन वर्षे कोरोनामुळे कोणतेच सण साजरे करण्यात आले नाहीत, मात्र या वर्षी शासनाने निर्बंध हटविले असल्याने गुढीपाडव्याचा सण उत्साहात साजरा करता आला. शनिवारी (दि. २) रोहा शहरासह ग्रामीण भागात नागरिकांनी आपल्या घरासमोर गुढी उभारून हिंदू नववर्षाचे स्वागत केले.

शहरात काही नवीन कार्यालये, दुकाने गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सुरू करण्यात आली. शहरात सायंकाळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने संचलन केले. या संचलनात अनेक स्वयंसेवक सहभागी झाले होते.

# खंडाळा घाटात कारचा अपघात

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबईहून पुण्याला जाणाऱ्या कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने खंडाळा घाटात टाटा पावर हाऊसजवळ कार रस्त्याच्या कडेला खड्ड्यात पडली.

रविवारी (दि. ३) दुपारी ४ वाजण्याच्या दरम्यान हा अपघात घडला. अपघातात कारचे पुढील बाजूचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणीही जखमी झाले नसल्याचे सांगण्यात आले.



(छाया : विनायक माडपे)

# खोपोली पालिका प्रशासनाची नागरी समस्या सोडवताना तारांबळ

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिकेच्या लोकप्रतिनिधींची मुदत संपली आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांचा कसोटीचा काळ सुरू झाला, कारण विविध समस्यांचे निराकरण प्रशासनाने केले नसल्याचा आरोप करीत सध्या उपोषण, आंदोलने, शिष्टमंडळाच्या भेटी आदींना प्रशासनातील अधिकाऱ्यांना सामोरे जाताना त्रेधा उडत आहे.

नगरपालिका हद्दीतील विविध नागरी समस्या आहे. यात प्रामुख्याने अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, रस्ता नसणे यांसारख्या अनेक समस्या आहेत. या पालिका प्रशासनाने सोडविल्या नाहीत, त्याबाबत निराकरण केले नाही, असा आंदोलनकर्त्यांचा आरोप आहे. यातील बहुतांश समस्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. या समस्यांबाबत लोकप्रतिनिधींना वारंवार निवेदने दिली असे आंदोलनकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे, मात्र उपोषणासारखे अंतिम हत्यार नगरसेवक सत्तेवर असताना का उगारले नाही? अशीही पालिका वर्तुळात चर्चा चर्चिली जात आहे.

सध्या पालिकेतील नगररचना विभाग आंदोलनकर्त्यांच्या रडारवर आहे. प्रामुख्याने काही वार्डात अतिक्रमणाचा भस्मासूर वाढला, तर अनेक अनधिकृत बांधकामांबाबत प्रश्न प्रलंबित आहे. त्यासंबंधी तक्रारींचा पाऊस सध्या निवेदनाद्वारे पडत आहे. या समस्या सोडविण्याबाबत तसेच आंदोलनकर्त्यांना शांत करण्यातच व नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्यातच सध्या मुख्याधिकाऱ्यांची कसोटी लागत आहे, अशी चर्चा सध्या सर्वत्र चर्चिली जात आहे.

# राजपुरी विभागातील शालेय विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्याचे वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम दिघी अंतर्गत अदानी फाउंडेशन व कृषिविकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आणि दिघी पोर्ट यांच्या सहकार्याने रविवारी (दि. ३) राजपुरी विभागातील शालेय विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी नायब तहसीलदार गोविंद कौटुंबे, गटशिक्षण अधिकारी बाबुलाल पाखरे, पोलीस सहाय्यक निरीक्षक दिपक राहुल, ग्रुप ग्रामपंचायत राजपुरी सरपंच हिरकणी गिदी, महालक्ष्मी मच्छिमार सोसायटी राजपुरी चेअरमन विजय गिदी, ग्रामपंचायत सदस्य महेंद्र आंबटकर, अदानी फाउंडेशनच्या वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी जयश्री काळे, कृषी विकासचे एकात्मिक ग्रामीण विकास प्रकल्प अधिकारी अमर सकटे, अमित पवार आणि संतोष पाटील, आगरदांडा केंद्रशाळेतील सर्व शिक्षक, राजिप शाळा राजपुरीचे विद्यार्थी उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीच्या प्रतिमा पूजनाने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. शैक्षणिक विकासाबरोबर शारीरिक विकास होणे महत्त्वाचे असून त्यासाठी मुलांनी मोबाईलमध्ये गुंतून न जाता मैदानी खेळ खेळणे गरजेचे आहे. यासाठी क्रीडा साहित्याचे वाटप अदानी फाउंडेशन आणि कृषी विकास संस्था करीत आहे ही शाळांसाठी अतिशय आनंदाची बाब आहे, असे मत गटशिक्षण अधिकारी बाबुलाल पाखरे यांनी व्यक्त केले. मुलांनी मैदानी खेळ खेळले तरच भविष्यात त्यांना पोलीस भरती, भारतीय लष्करात भरती होण्यासाठी मदत होईल, असे मत पोलीस सहाय्यक निरीक्षक दिपक राहुल यांनी व्यक्त केले.

शालेय विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेस मार्गदर्शन मिळाले तर भविष्यात हेच विद्यार्थी उद्याचे अधिकारी बनतील, असे मत नायब तहसीलदार गोविंद कौटुंबे यांनी व्यक्त केले. अदानी पोर्ट याठिकाणी आल्यामुळे रायगड जिल्ह्यातील राजपुरीसारख्या दुर्गम भागाचा विकास नक्कीच होणार असून यासाठी लागणारे सर्व सहकार्य करण्यास तयार आहोत, असे मत विजय गिदी यांनी व्यक्त केले. यानंतर राजिप शाळा राजपुरी, डोंगरी, उर्दू शाळा राजपुरी, राजिप शाळा अगरदांडा, नांदले या शाळांना क्रिकेट किट, बॅडमिंटन सेट, फूटबॉल, व्हॉलिबॉल, बुद्धीबळ, कॅरम, लेझीम, लुडो, नवा व्यापार, दोरी उडी, लगोरी आदी क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले.

# कर्जत बेडीसगावमधील आदिवासी रस्त्यासाठी आजपासून करणार उपोषण

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्याचे शेवटचे असलेल्या बेडीसगाव आणि परिसरातील नऊ आदिवासी वाड्यांना जोडणारा रस्ता अज्ञातांनी जेसीबीच्या साहाय्याने उखडला आहे. त्याबद्दल तक्रारी करून महिना लोटला तरी शासनाकडून कोणतीच दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे स्थानिक आदिवासींनी सोमवारपासून (दि. ४) उपोषणाचा इशारा दिला आहे.



वहिवाट असलेला रस्ता खोदणाऱ्यांवर अॅट्रॉसिटी अॅक्टखाली गुन्हा दाखल करावा आणि रस्ता शासनाने तयार करून द्यावा या मागणीसाठी हे उपोषण केले जाणार आहे.

शेलू ग्रामपंचायतीचे माजी सदस्य आणि बेडीसगावचे ग्रामस्थ, मंगळदरवडा तसेच स्थानिक शेतकरी आणि आदिवासी सेवासंघाचे रायगड जिल्हा सचिव गणेश पारधी आणि कर्जत तालुकाध्यक्ष जैतू पारधी हे उपोषणाला बसणार आहेत. तहसील कार्यालयाबाहेर हे उपोषण होणार असल्याची माहिती देण्यात आली.

# खोपोली चिंचवली येथे स्वच्छतेची गुढी

**खोपोली : प्रतिनिधी**

हिंदू नववर्षाचा प्रारंभ वर्षप्रतिप्रदा म्हणजेच गुढीपाडवा उत्साहाने होत असतो. या दिवशी गुढी उभारून आनंद साजरा करीत असतो. नगरपालिका हद्दीतील चिंचवली नवतरूण सेवा फाउंडेशन येथील तरुणांनी एकत्र येत स्वच्छतेची गुढी उभारून शाळेचे अस्वच्छ पटांगण चकाचक केले.

प्रारंभी गुढीचे पूजन सिताराम शिंदे व संदीप गंभीर यांच्या हस्ते करण्यात आले. सध्या खोपोली नगरपालिकेचे स्वच्छता अभियान मिशन सुरू असून या पालिकेतील अधिकारी व स्थानिक नेत्यांनीही या तरूणांच्या स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या अभियानाचे कौतुक केले. स्वच्छतेची गुढी या कार्यक्रमाअंतर्गत तरूणांनी हातात झाडू, घमेले घेऊन पटांगण व परिसर स्वच्छ केला.

या वेळी स्वच्छतेचा संदेश देणारे, पर्यावरणाचे संवर्धन करा, प्लास्टिक वापर टाळा, मुक्या प्राण्यांवर दया करा आदी तरूणांनी हातात फलक घेऊन नागरिकांमध्ये जनजागृतीचा संदेश दिला.



(छाया : विनायक माडपे)

# सेकंड होमसाठी रायगडला पसंती

## गुढीपाडव्यानिमित्त घरखरेदी जोमात

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील कर्जत, खालापूर, अलिबाग, पेण, रोहा-माणगावपर्यंत 'सेकंड होम' खरेदी करणाऱ्यांकडे मुंबई, ठाणे, पुण्यासारख्या मोठ्या शहरातील नागरिकांचा कल वाढू लागला आहे. त्यातच या परिसरात घरांच्या किमती अद्यापही आवाक्यात आहेत. त्यामुळे साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडव्यानिमित्त शनिवारी घरखरेदीला अनेकांनी पसंती दिली. कोरोना कालावधीत बांधलेली हजारो घरे सध्या कमी किमतीत उपलब्ध आहेत, त्याचाही फायदा घेत ही खरेदी झाली.

कोरोना कालावधीत बांधलेल्या घरांना फारशी मागणी नव्हती. यामुळे कर्जत, खालापूर, अलिबाग येथील बांधकाम व्यावसायिकांनी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी सवलती दिल्या होत्या. या सवलती गुढीपाडव्यानंतर संपणार आहेत.

राज्य सरकारनेही रेडीरेकनरचे दर वाढविण्याचा निर्णय घेतला असून त्याची अंमलबजावणी १ एप्रिलपासून सुरू झाली. त्याचबरोबर मजुरीही दोन महिन्यांपासून २० टक्के वाढली आहे. युक्रेन-रशिया युद्धामुळे स्टील, सिमेंटच्यकिमतीतही लक्षणीय वाढ होत आहे. यामुळे घरे महाग होण्याआधीच खरेदी करण्यासाठी गुढीपाडवा हा शेवटचा मुहूर्त अनेकांनी साधला. घर किंवा जमीन खरेदीच्या व्यवहारांची बोलणी झाल्यानंतर ठराविक रक्कम देत त्यांनी हा संकल्प सोडला.



### अलिबागच्या घरांना सर्वाधिक मागणी

मुंबईपासून समुद्रामार्गे अलिबाग हे निसर्गरम्य असे जवळचे ठिकाण आहे. त्यामुळेच परिसरातील मालमत्तांचे दर गगनाला भिडले आहेत. त्यामुळे आता मांडवा, किहीम या परिसरातील शेतजमिनी विकत घेऊन फार्महाऊस बांधण्याचा अनेकांचा प्रयत्न असतो. पनवेल, उरण या तालुक्यांनंतर अलिबागमधील जमिनींना पसंती मिळत आहे.

**अनेक वर्षे दादर येथे लहानशा खोलीत राहिलो. आता रायगड जिल्ह्यातील कंपन्यांमध्ये रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध आहेत. शिवाय येथे दुकाने, लहान-मोठे उद्योग किंवा पर्यटनासंदर्भातील एखादा उद्योग सुरू करणे शक्य आहे. यामुळे आम्ही रोहा तालुक्यात घरखरेदी करणे पसंत केले.**

**-जयदीप सावंत, ग्राहक**

**गुढीपाडव्याच्या दिवशी निबंधक कार्यालये बंद होती. त्यामुळे ज्यांना व्यवहार करायचा आहे, त्यांनी ठराविक रक्कम दिली. पुढील काही दिवसांत हा व्यवहार पूर्ण करण्याचा प्रयत्न असेल. रायगडमध्ये ही पद्धत घर खरेदीसाठी नव्हती, परंतु भविष्यातील बदलत्या परिस्थितीमुळे आजचा मुहूर्त अनेकांनी साधला असावा.**

**-दिलीप जोग, बांधकाम व्यावसायिक**

# मुरूडमध्ये स्वामी समर्थांचा प्रगट दिन उत्साहात साजरा

**मुरूड : प्रतिनिधी**

डोंगरी येथील स्वामीभक्त माऊली त्रिशा पाटील यांच्या मठात श्री स्वामी समर्थ अक्कलकोट महाराजांचा प्रगट दिन रविवारी (दि. ३) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रगट दिनानिमित्त सकाळी ६ वाजल्यापासून भक्तांनी हजेरी लावली होती. ७ वाजता होमाला सुरुवात झाली. समर्थ प्रासादिकचा अभिषेक भक्तांवर करण्यात आला. स्वामी समर्थ यांच्या नामस्मरणात शेकडो भक्त तल्लीन झाले होते.



स्वामीभक्त माऊली त्रिशाताई यांनी जीवन सहज व सुंदर जगण्यासाठी स्वामींचे स्मरण कसे करावे ते सांगितले. कोरोनाच्या काळात स्वामी मठ बंद असल्याने २ वर्षांनंतर मोठा कार्यक्रम घेण्यात आला. कोरोना काळात माऊली त्रिशताईंनी भक्तांचे मनोबल वाढवून मानसिक आरोग्य कसे सांभाळावे याबाबत माहिती दिली. दुपारी १ ते ३ महाप्रसादाचा भक्तांनी लाभ घेतला.

सायंकाळी स्वामी समर्थ अक्कलकोट महाराजांची भव्य पालखी काढण्यात आली. ५०० भक्तांनी स्वामींच्या दर्शनाचा लाभ घेतला. पालखी डोंगरी गावात स्वामी समर्थ गजरात वाजत-गाजत फिरवण्यात आली. स्वामी समर्थ मठात कार्यक्रमाचे नियोजन स्वतः माऊली त्रिशताईंनी आणि पती डॉ. दत्तात्रय पाटील, स्वामीभक्त हसमुख जैन, नागेंद्र सिंह, भारत डोंगरोकर, भावेश शाह, मेहुल शाह, अजित गुरव आदी भक्तांनी केले. रात्री पालखीची सांगता झाली.

# ऑस्ट्रेलिया सातवे आसमान पर!

## महिला संघाने सातव्यांदा कोरले विश्वचषकावर नाव





**ख्राईस्टचर्च : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलिया महिला क्रिकेट संघाने रविवारी (दि. ३) ख्राईस्टचर्च येथे इंग्लंडला ७१ धावांनी पराभूत करीत एकदिवसीय विश्वचषकावर विक्रमी सातव्यांदा नाव कोरले. ऑस्ट्रेलियाने पहिल्यांदा फलंदाजी करत ५० षटकात ३५६ धावांचा डोंगर उभा केला होता. इंग्लंडला सर्वबाद २८५ धावाच करता आल्या.

या लढतीत प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाला सलामीवीर एलेसा हिली हिने सुरुवातीपासूनच आपल्या संघाला आघाडीवर ठेवले. तिच्या १७० धावांच्या खेळीच्या जोरावर ऑस्ट्रेलियन संघाला निर्धारित ५० षटकांमध्ये ५ बाद ३५६ धावा करता आल्या. या खेळीत ४१ धावांवर असताना मिळालेले जीवदान तिच्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले. तिला रेचेल हेन्स ६८ आणि बेथ मुनी ६२ यांच्याकडून चांगली साथ मिळाली.

इंग्लंडचा बुरुज ढासाळत असताना नतालिया स्किव्हरने एकाकी झुंज देत शतक (१४८ धावा) झळकावले, मात्र तिला दुसरीकडून पुरेशी साथ मिळाली नाही. अखेर ऑस्ट्रेलियाने इंग्लंडचा ७१ धावांनी पराभव केला.

महिला विश्वचषकाच्या अंतिम फेरीत ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडचे संघ ३४ वर्षांनंतर आमने-सामने आले होते. त्यात ऑस्ट्रेलियाने बाजी मारली.

## फेडरेशन चषक ॲथलेटिक्स स्पर्धा

# महाराष्ट्राच्या संजीवनी जाधवला सुवर्णपदक

**कोळीकोड : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या संजीवनी जाधवने वरिष्ठ गटाच्या फेडरेशन चषक ॲथलेटिक्स स्पर्धेतील महिलांच्या १० हजार मीटर शर्यतीत शनिवारी सुवर्णपदक पटकावले. २५ वर्षीय संजीवनीने ३३:१३.०७ मिनिटे वेळ नोंदवली, परंतु एक मिनिट आणि तीन सेकंदांच्या विलंबामुळे आशियाई क्रीडा स्पर्धेस पात्र ठरण्यात ती अपयशी ठरली.

महाराष्ट्राच्या ऐश्वर्या मिश्राने ५२.४१ सेकंद अशी वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी नोंदवत महिलांच्या ४०० मीटर स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. या स्पर्धा प्रकारातील गेल्या १० वर्षांतील सर्वोत्तम १० भारतीय महिला खेळाडूंमधील कामगिरी ऐश्वर्याने साकारली.

यंदाच्या वर्षांतील ही दुसऱ्या क्रमांकाची सर्वोत्तम कामगिरी ठरली. इंडियन ग्रां. प्रि. शर्यतीत प्रिया मोहनने ५२.३७ सेकंद ही सर्वोत्तम वेळ नोंदवली होती. २०० मीटर स्पर्धा प्रकाराच्या जागतिक अजिंक्यपदाच्या पात्रतेकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी हिमा दासने १०० मीटर शर्यतीतून माघार घेतली. द्युती चंदने १०० मीटर शर्यतीची अंतिम फेरी गाठली.



# पेनल्टी शूटआऊटमध्ये भारताची इंग्लंडवर सरशी

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

भारतीय पुरुष हॉकी संघाने प्रो लीगमधील चांगली कामगिरी सुरू ठेवताना शनिवारी इंग्लंडवर ३-३ अशा नियमित वेळेतील बरोबरीनंतर पेनल्टी शूटआऊटमध्ये ३-२ अशी सरशी साधली.

### प्रो लीग हॉकी (पुरुष)

टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या भारतीय संघाने यंदा प्रो लीग हॉकीमध्ये सातत्यपूर्ण खेळ केला आहे. त्यांचा हा नऊ सामन्यांतील पाचवा विजय ठरला असून हा संघ १८ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. दुसऱ्या स्थानावरील जर्मनीच्या खात्यावर १७ गुण असून ते भारतापेक्षा एक सामना कमी खेळले आहेत.



कलिंगा स्टेडियमवर शनिवारी झालेल्या सामन्याच्या पूर्वार्धात यजमान भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांनी आक्रमक खेळ केला. त्यामुळे मध्यांतराला दोन्ही संघांमध्ये २-२ अशी बरोबरी होती. भारताकडून अभिषेक (१३वे मिनिट) आणि शमशेर सिंग (२६वे मि.) यांनी गोल झळकावले, तर इंग्लंडचे दोन्ही गोल निकोलसने (७ आणि २७वे मि.) पेनल्टी कॉर्नरच्या साहाय्याने केले.

उत्तरार्धात सामन्यात चुरस कायम राहिली. ५१व्या मिनिटाला उपकर्णधार हरमनप्रीत सिंगने पेनल्टी कॉर्नरवर गोल करत भारताला ३-२ अशी आघाडी मिळवून दिली. मात्र, सामना संपायला केवळ एक मिनिट शिल्लक असताना सॅम वॉर्डने गोल केल्यामुळे इंग्लंडने ३-३ अशी बरोबरी साधली आणि विजेता ठरवण्यासाठी पेनल्टी शूटआऊट खेळवण्यात आला. यात भारताकडून अभिषेकने दोनदा, तर राजकुमार पालने एकदा चेंडू गोलजाळ्यात मारला.

### माहीच्या चपळाईचा नाद करायचा नाय! भानुका राजपक्षेला 'असे' केले धावबाद

**मुंबई** : आयपीएलमध्ये रविवारी (दि. ३) चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्ज यांच्यात सामना रंगला. या सामन्यात पंजाबचा भानुका राजपक्षे धावबाद झाला. चोरटी धाव घेण्याच्यात प्रयत्नात धावपट्टीवर अर्ध्यापर्यंत गेल्यानंतर शिखर धवन आणि राजपक्षे यांनी परत येण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत जॉर्डनने चेंडू धोनीकडे सोपवला होता. धोनीनेही वायुवेगाने हवेत झेप घेत चेंडू स्टंप्सला लावला. त्यामुळे राजपक्षेला तंबूत परतावे लागले.






# राजस्थानची मुंबईवर मात; बटलरचे शानदार शतक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अनुभवी सलामीवीर जोस बटलरच्या (६८ चेंडूंत १०० धावा) दिमाखदार शतकाच्या जोरावर राजस्थान रॉयल्सने शनिवारी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटमधील सामन्यात मुंबई इंडियन्सला २३ धावांनी नमवले. त्यामुळे दोन सामन्यांनंतरही मुंबईची विजयाची पाटी कोरीच राहिली.

डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर झालेल्या सामन्यात राजस्थानने दिलेल्या १९४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईला २० षटकांत ८ बाद १७० धावांचीच मजल मारता आली. मुंबईचा कर्णधार रोहित शर्माला (१०) प्रसिध कृष्णाने डावाच्या दुसऱ्याच षटकात माघारी पाठवले, तर अनमोलप्रीत सिंग (५) पुन्हा अपयशी ठरला. यानंतर सलामीवीर इशान किशन (४३ चेंडूंत ५४) आणि युवा तिलक वर्मा (३३ चेंडूंत ६१) या डावखुऱ्या फलंदाजांनी अप्रतिम खेळी केल्या. त्यांनी तिसऱ्या गड्यासाठी ८१ धावांची भागीदारी रचत मुंबईच्या विजयाच्या आशा जिवंत ठेवल्या, मात्र हे दोघे दोन षटकांच्या अंतराने बाद झाल्यामुळे मुंबईचा संघ अडचणीत सापडला. मग किरॉन पोलार्डचा (२४ चेंडूंत २२) अपवाद वगळता एकाही फलंदाजाला दुहेरी धावसंख्या गाठता न आल्याने मुंबईला पराभव पत्करावा लागला.

तत्पूर्वी, मुंबईने नाणेफेक जिंकून फलंदाजीचे आमंत्रण दिल्यावर राजस्थानने ८ बाद १९३ अशी धावसंख्या उभारली. यशस्वी जैस्वाल (१) आणि देवदत्त पडिक्कल (७) स्वस्तात माघारी परतल्यावर बटलर व कर्णधार संजू सॅमसन (२१ चेंडूंत ३०) यांनी राजस्थानच्या डावाला आकार दिला. या दोघांनी ८२ धावांची भागीदारी रचली. पोलार्डने सॅमसनला बाद केल्यावर बटलरने शिम्रॉन हेटमायरच्या (१४ चेंडूंत ३५) साथीने फटकेबाजी केली. अखेर या दोघांना जसप्रीत बुमराने बाद केले.

बटलरने यंदाच्या हंगामातील पहिले शतक झळकावले. एकीकडे इतर गोलंदाज निष्प्रभ ठरत असताना बुमराने चार षटकांत केवळ १७ धावांच्या मोबदल्यात तीन मोहरे टिपले.

### पंचांच्या चुकीमुळे ललित यादव झाला बाद

**पुणे : प्रतिनिधी**

आयपीएलच्या पंधराव्या हंगामातील दहावा सामना चांगलाच रोमहर्षक ठरला. दिल्ली कॅपिट्लस आणि गुजरात टायटन्स यांच्यात झालेल्या या लढतीत गुजरातने दिल्लीला धूळ चारली. गुजरातने दिलेले १७२ धावांचे लक्ष्य दिल्लीला गाठता आले नाही. या सामन्यात दिल्लीचा ललीत यादव बाद होतानाचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे. या सामन्यात पंचाने चूक केली आहे, असे म्हटले जातेय.

गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्ससमोर १७२ धावांचे लक्ष्य ठेवले. या धावसंख्येचा पाठलाग करताना दिल्लीचा ललित यादव १२व्या षटकात धावबाद झाला. विजय शंकर चेंडू टाकत असताना ललित चोरटी धाव घेण्यासाठी धावला, मात्र ललित आणि ऋषभ पंत गोंधळल्यामुळे अभिनव मनोहरने विजयकडे चेंडू फेकला, मात्र ललितला बाद करताना विजयचा एक पाय स्टंप्सला लागला. त्यामुळे चेंडू स्टंप्सला लावण्याअगोदारच एक बेल पडली. त्यानंतर विजयने चेंडूच्या मदतीने दुसरी बेल उडवली. हे सर्व घडल्यानंतर पंचाने ललितला धावबाद म्हणून जाहीर केले. हा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.






# नवघरमध्ये भाई चषक क्रिकेट स्पर्धा रंगली; मान्यवरांची उपस्थिती

**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील नवघर येथील सुधीर घरत सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित भाई चषक २०२२ या रात्रीच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन २९ मार्च ते १ एप्रिल या कालावधीत करण्यात आले होते. या स्पर्धेच्या दरम्यान भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची उपस्थिती लाभली.




स्पर्धेचे आयोजक सुधीर घरत, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष पी. जे. पाटील, भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, उद्योजक विकास नाईक, तालुका सरचिटणीस दीपक भोईर, जिल्हा उपाध्यक्ष नीलकंठ घरत, उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील, जनार्दन भोईर, कामगार नेते नवघर जेष्ठ नागरिक संघटनेचे उपाध्यक्ष सुरेश तांडेल, अखिल भारतीय कराडी समाजाचे अध्यक्ष महादेव बंडा, नवघर ग्रा. पं. सदस्य दमयंती अशोक पाटील, भुपेंद्र कडू, ग्रा. पं. सदस्य मयुरी पाटील यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले होते. विजेत्या संघाचा मान्यवरांच्या हस्ते रोख रकमेसहित सुधीर घरत सामाजिक संस्थेच्या मानाचा भाई चषक २०२२ देऊन सन्मानीत केले.

नवीन शेवा, जासई, मोठी जुई, नागाव या संघांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ क्रमांक पटकावले. या स्पर्धेसाठी कामगार नेते सुधीर घरत, संस्थेचे अध्यक्ष जयप्रकाश भोईर, उपाध्यक्ष अजित पाटील, सेक्रेटरी संकेत कडू, खजिनदार नितीन पाटील, ज्ञानेश्वर भोईर, हरेश बंडा, अतिष बंडा, योगेश तांडेल, राजेश पाटील, कुंदन कडू, हरेश बंडा, धर्मेंद्र तांडेल, समीर घरत, प्रणित घरत, दिनेश बंडा आदींचे मोलाचे सहकार्य मिळाले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com